आहे. म्हणुन या व्यापारी धोरणांचा युरोपात विरोध होता हे या आधि पाहिले आहे. चिनमध्ये अधिक मागणी असणाऱ्या व भारत देशात उत्पन्न होत असणाऱ्या एका वस्तुला युरोपीय व्यापाऱ्यांनी ओळखले. ते अफु ( नशेचा पदार्थ) भारतीय शेतकरी मोठ्या प्रमाणात आफुलचे उत्पादन करण्यासाठी ते त्यांना प्रोत्साहीत करत व फार कमी किमतीत त्यांच्या कडुन व्यापारी विकत घेत असे. या आफु ला अनैनिक बळजबरीच्या मार्गाने चिन ला पाठवुन तेथील लोकांना विकत होते. आफुच्या बदल्यात चिन पासुन रेशम चहा, घेऊन ते युरोपला आणुन विकत होते. त्यामुळे चांदी देऊन चिनशी व्यापार करणे वाचले. आफुचे बळजबरीच्या वाईट मार्गाने निर्यात करणे वाढल्यामुळे युरोपच्या व्यापाऱ्यांना त्या आधी एकाच शहरापुरता व्यापार करण्याच्या परवानगीला चिनच्या अधिकाऱ्यांनी रद्द केले. त्यामुळे चिन व इंग्लड यांच्या मध्ये 1839-42 मध्ये आफु चें युध्द म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या युध्दाची सुरुवात झाली. या युध्दात इंग्लडला युरोपातील इतर देशांनी मदत केली. इंग्लड च्या हस्ते चिन चा पराभव झाला. त्यामुळे अनेक अन्यायी निर्बंध तहाव्दारे व्यापार करण्यासाठी आता राहिलीया नाही. इंग्रजी कायद्यानुसारच इंग्लंड चिन मध्ये व्यापारी प्रदेश निर्माण केले. इंग्लडला अत्यंत महत्वाचा देश म्हुणन ओळखावे असे चिन वर बळजबरीने दबाव टाकला गेला. त्यामुळे चिनने व्यापारासाठी इतर देशाला दिलेली सुट आता इंग्लडला सुध्दा लागु झाली.



*चित्र . 15.6: पाण्याच्या रंगाने काढलेले पेपर चित्र. त्याचे शीर्षक मकाऊ स्ट्रीट सीन मकाऊ हे चीनमधील बंद शहर होते, जिथे युरोपिना व्यापारची परवानगी होती*

चक्रवर्ती राजाचे शासन 1911 पर्यंत होते. त्या काळात टप्याने चिन ने आपले स्वातंत्र गमविले. भारत देश लॅटीन अमेरीका देशा सारखे चिन कोणत्याच युरोपीय देशाच्या प्रत्येक्ष राजकीय सत्ता प्रशासनिय अधिपत्या खाली नव्हत्या. परंतु असमतोल करारामुळे युरोपीय देशांना अनुकुल अशा शर्तींना चिनला मान्यकरावेच लागले. त्याच प्रमाणे युध्दात झालेले नुकसान युरोपीयानांना मोठ्या प्रमाणात चिनला भरुन द्यावे लागले. त्याच प्रमाणे त्यांना स्वातंत्र वाणिज्य अधिकार दिले. आयातावर नाममात्र कर लावावे लागले. चिन च्या भुमीवर युरोपीय देशांनी निर्माण केलेल्या व्यापारी प्रदेशात, प्रातांत चिन चे कायदे नसुन युरोपीय कायदेच लागु करण्यात आले. अशा प्रकारे देशातील सामान्य दैनदिन शासन प्रशासनाची जबाबदारी चिन सरकारची परंतु आर्थिक धोरणे मात्र युरोपीयनांच्या स्वाधीन गेली. आता युरोपीयांना त्यांच्या उत्पादीत वस्तु चिन मध्ये कुठेही विकु लागले. त्यांच्या उद्योगाला लागणाऱ्या कच्चा माल कमी किंमतीत विकत घेऊ लागले. त्याच वेळी चिन मध्ये कोणत्याच प्रकारचे उद्योग धंद्यांचा विकास होऊ दिला नाही. चिन शी व्यापार करणारा इंग्लड एकटाच देश नव्हता. फ्रांस, जर्मनी, रशिया सारखे इतर युरोपीय देश सुध्दा चिनशी व्यापार करत होते. चिन मधील काही भाग देशाला देऊन त्या भागात इतर देशांना स्वतंत्र रित्या प्रवेश करण्याचे अधिकार असु नये म्हणुन चिन सरसावली त्या त्या देशांनी



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

- पाश्चात देश चिन कडुन आयत करणारी प्रमुख वस्तु __________.
- चिन मध्ये पाश्यात देश विकण्यासाठी प्रयत्न केलेला उत्पादन _______.
- चिन मध्ये प्रभावी व्यापार करण्यासाठी प्रयत्न केलेले आशियायी देश ________.

बळजबरीने केली. हे चिन चे विभाजन न होऊ देणे हा त्यातील एक प्रकारच होता. या प्रकारे चिन आर्थिक राजकीय दृष्टया अनेक प्रकारच्या युरोपीय नियत्रंणा खाली होता. या युरोपीय देशांना आशिया मधील वरचढ असणारी नविन ताकत शक्ती जपान उदयास आला. 1861 मध्ये जपानमध्ये राजकीय क्रांतीनंतर वेगाने औद्योगिकरण झाले. आधुनिक देश म्हणुन पुढे उदयास आला. स्वस्त कच्चा माल खजिन पदार्थ घेऊन त्यांच्या उद्योगात निर्माण होणारा माल, उत्पादीत वस्तु विकण्यासाठी वसाहती प्रदेश जपान शोधु लागला. 1894-95 मध्ये चिनशी युध्द करुन मोठ्या भु प्रदेश द्यावा लागला. नुकसान भरपाई सुध्दा जपानला करावी लागली. या प्रमाणे युरोपीय शक्तीने जपानला त्यांचा अधिकार प्रदेश म्हणुन चिन मध्येच निर्माण केला. चिन हा कोणत्याही एका देशाची वसाहती प्रदेश नाही म्हणुन त्याला अर्थवसाहती प्रदेश म्हणुन संबोधतात.

## आफ्रिकेतील वसाहतीवाद

आफ्रिकेमध्ये वसाहती प्रदेश तयार करण्यासाठी युरोपीय देश 9 व्या शतकाच्या मध्य काळा पर्यंत कोणतीच अभिरुची दिसत नव्हती. 16 व्या शतकापासुन ते 19 व्या शतकापर्यत अमेरीकेमध्ये विकण्यासाठी गुलामगीरांची पुरवठा करण्याचा प्रदेश म्हणुन बघत होते. इग्लड सारखे काही देश भारत देश चिनला जाणाऱ्या मार्गातील आफ्रिकेच्या किनारी बंदरात गुंडहुप सारख्या भागात त्यांच्या जहाजात इंधन वस्तु सामुग्री भरण्यासाठी यांचा उपयोग करत होती. वसाहती व्यापारी लाभासाठी आफ्रिका तितका उपयुक्त नाही. असा त्या देशांचा मत होते.

## संशोधन (Exploration)

आफ्रिका खंडा विषयी त्यांच्या आतील प्रांताविषयी फार थोंडी माहिती मिळाल्या मुळे त्याला अंधार खंड ('Dark Continent') म्हणुन युरोपीय लोक म्हणत. याखंडात पुर्ण किनार प्रदेशातील सपाट मैदाची पट्टी सोडली तर बाकी सर्वत्र उंच पठार भुमी आहे. नद्या आहे. नद्या जास्तीत जास्त पठार प्रदेशात वाहतात. निमुळ त्या रुपात किंवा उंच धबधब्या च्या रुपात आढळतात. या कारणामुळे युरोपीय व्यापारी या खंडाच्या मधील भु प्रदेशात गेले नाही. 19 व्या शतकाच्या विशेषता 1850 नंतर आफ्रिका खंडातील आतील प्रदेशाचा शोध घेण्यासाठी त्या प्रदेशातील नद्या पर्वत, खनिज पदार्थ, जंगले, त्याचे उत्पादन तेथे राहणारे लोक यांची माहिती व नकाशे तयार करण्यासाठी युरोपीय देशांनी आपले गट पाठविले. खंडाच्या आतील भागावर नियंत्रण वसाहत तयार करण्यासाठी मोलाची माहितीच्या आधारे प्रणाली का योजना तयार करुन शकले. युरोपाच्या प्रमुख संधोनात डेविड लिंविगंस्टन हेच एम. स्टॉन्ली हे प्रमुख होते. हे दोघे इंग्लड कडुन दक्षिण मध्ये आफ्रिकेतील विशाल भु प्रदेशाचा नकाशा तयार केला. 1850 ते 1860 मध्ये रिचर्डबर्टन, जॉन स्पीक, जेम्स ग्रान्ट यांच्या अथक संशोधनामुळे मध्ये भु भागातील मोठ मोठे तळे, सरोवरे, नैलनदीचे उगमस्थान ओळखु शकले. 19 व्या शतकाच्या शेवटी नैल दीच्या प्रारंभा पासुन तिच्या प्रवाह मार्गाचे तसेच नैजर,कांगो, जांबेजी नदीच्या प्रवाहांनी



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

1913 चे आफ्रिका खंडाचा नकाशा पाहुन आफ्रिकेला कितपर्यंत युरोपीय देशा आपल्या वसाहती प्रदेशाचा भाग म्हणुन बदलवु शकले.

आधुनिक आफ्रिकेच्या नकाशांशी तुलना करा ?

आफ्रिकन देशांची एक यादी करुन वसाहीतींची नावे खालील तक्त्यात भरा




| आधुनिक देश | 1913 च्या वसाहती प्रशासन देश |
|---|---|
| दक्षिण आफ्रिका | |
| इजिप्त | |
| नायजेरीया | |
| घना | |
| लिबीया | |
| अल्जेरीया | |
| अंगोला | |
| कांगो | |

आफ्रिकेतील भरपुर नैसर्गिक साधन सामुग्री ओळखु शकले. या संशोधनातील अनेक लोकांनी आफ्रिकी लोकांत ख्रिचन धर्माचा प्रसार करण्याच्या उद्देशाने विविध चर्च तर्फे सुध्दा आले.

इंग्लड फ्रांस, बेल्जीयम, जर्मनी,इटली सारख्या युरोप देशात औद्योगीक विकास वाढल्यामुळे भरभराटीत आल्यामुळे 1850 च्या नंतर त्यांच्या उत्पादनांना आफ्रिकेत बाजार पेठ मिळावी म्हणुन संशोधन केले.

*स्क्रँमंबल फॉर आफ्रिका: ही वाक्य आफ्रीकातील प्रदेशावर आपले हक्क सांगणाऱ्या वेड्या-पिश्या युरोपियांचे वर्णन करते.*

तांबे खनिज धातु, रब्बर, पामाईल, खाद्यातेल, कपाशी, चहा, कोको सारख्या अनेक प्रमुख औद्योगीक कच्चामाल आफ्रिकेत आहे हे सुध्दा त्या देशांनी ओळखले. त्याच वेळेस युरोपीय उत्पानाकांना आफ्रिकेत मुख्य बाजारपेठ आहे. जर्मन, इटली सारखे देश उदयास आल्यामुळे औद्योगीकरणात मागे पडल्यामुळे इतर युरोपीय देशा पेक्षा जास्तीत जास्त वसाहती प्रदेश स्थापुन आपली सत्ता प्रस्थापित करावी म्हणुन प्रयत्न केले. त्यावेळेस वसाहत करण्यासाठी भरपुर लोकसंख्या, अफाट नैसर्गिक साधन सामुग्री चे आफ्रिका खंड एकच करुन होते.

1870 कॉग्रो मध्ये आफ्रिकेकडे धाव घेण्याची शर्यत सरु झाली. 1870 पर्यंत आफ्रिकेत फक्त 10% भागच वसाहती प्रशासनात होता. अजुन 40 वर्षात इथीयोपिया अजुन दोन लहान भाग सोडले तर आफ्रिका खंडात संपुर्ण



*लियोपोल्ड - II*



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




*चित्र. 15.7: 1906 मध्ये पुंचमध्ये प्रकाशीत झालेले व्यंग चित्र. कंगोलीस मानसाला आणि लियोपोल्डला रब्बरमध्ये गुंडाळल्या सारखे दर्शविते. वसाहती प्रशासनाच्या काळात कांगोमध्ये रबरचे झाड लावण्याची सुरुवात झाली.*

वसाहती प्रशासनाखाली आला. इथीयोपियाने युध्दात इटलीला पुर्णपणे हरविले होते. युरोपीय सैन्यांचा पराभव करणारे एकमेव युरोपेत्तर साम्राज्य हे एकच वर्षानुवर्षे वसाहती प्रांतासाठी युरोपीय देशांनमध्ये स्पर्धा तिव्र झाल्या भेटी विचार वाव सदभाव शांतीने समस्या सोडविणे होऊ शकले नाही. याचा परिणाम तो पर्यंत मानवाने न पाहु शकणाऱ्या विध्वसंक युध्द पाहिजे जागतिक युध्द 1914 मध्ये सुरु झाले.

**वसाहती प्रशासनाचा अनुभव - काही भागाचा अभ्यास करु या.**

## जैर (Congo)

बेल्जीयम चे दुसरे लियोपाल्ड नावाचे राजे यांनी कांगो प्रांतामध्ये 1869-1874 च्या काळात स्टॉन्ली नावाच्या संशोधकाला गुप्तपणे पाठविले. त्याने आफ्रिकेतील अनेक नेत्यांना भेटुन त्यांचा प्रदेश आपल्या स्वाधीन करु शकला. काही राजांची हत्या करुन त्यांच्या राज्यांना जोडुन घेतले. 1882 मध्ये दुसरा लियोपाल्ड आफ्रिकेच्या भागात 23,00,000 चौरस मिटर पर्यंत विस्तार केला. हे विस्तीर्णात बेल्जीयम पेक्षा 75 पटीने जास्त आहे. त्याला कांगोचे स्वतंत्र राज्य म्हणुन पाहु लागले. या वसाहती प्रदशे लियोपाल्ड दुसरा यांची स्वत:ची संपत्ती होती. हस्तदंत, रब्बर, यांच्या उत्पादनासाठी याचा उपयोग करत होते. कांगोचे स्वतंत्र राज्य (कांगोस फ्रिस्टेट) वसाहतीतील नागरीकांवर अन्याय शोषण करत राज्य प्रशासन चालवित होता. मोठ्या संख्यत नागरीकांची हत्या गुलाम कामगार म्हणुन त्यांचा उपयोग करत होते. गावातील प्रत्येक व्यक्ती थोडे रब्बर द्यावे. तसे रब्बर न देणाऱ्या लोकांचे हात तोडुन टाकत असे. देशांची लोकसख्येतील 1.6 कोटी लोकांत 1885-1908 काळामध्ये 80 लाख पासुन एक कोटी पर्यत लोक मरण पावले. असा अंदाज लियोपाल्ड दुसरा यांनी पुष्कळ संपत्ती प्राप्त केली होती. त्यातील काही भाग बेल्जीयम मध्ये इमारती बांधण्यासाठी उपयोग केला. बेल्जीयम बरोबर जगात सर्वत्र निषेध ज्वाला भडकल्यामुळे कांगोवरील आपल्या राज्यांच्या प्रशासनाचा बेल्जीयम सरकारला बळजबरीने अंत करण्यात आला. कांगोला बेल्जीयमच्या पार्लमेंट लोकसभे खाली आणले.

अशीच परिस्थिती शेजारच्या फ्रेंच कांगोची होती. ह्या भागातून सवलत मिळणाऱ्या कंपनींनी संसाधने मिळविली. त्यांनी क्रूर पद्धतींनी 50 टक्के स्थानिक लोकांना मारले.

## दक्षिण आफ्रिका

त्या दिशेने प्रवास करण्याचा जहाजात इंधन भरण्यासाठी नाविकांच्या विश्रांतीसाठी गुडहुप समोर इंग्लड व्यापार केंद्राची स्थापना केली. काही डच शेतकऱ्यांनी या प्रदेशात स्थायीक होऊन शेती व्यवसाय केला. त्या मार्गाने जाणाऱ्या नाविकांना त्यांच्या उत्पादीत माल विकत मुळ स्थानिक लोकांशी संघर्ष करुन त्यांना त्यांच्या जवळील जमिनी बळकावुन त्यांना हकलुन लावण्याचा प्रयत्न केला. त्यांना बोर्यल म्हणत. या प्रदेशावर ब्रिटीशांचे नियत्रंण वाढत होते. त्यामुळे असंतुष्ट बोअर्स दुसऱ्या भागा प्रातांत जाऊन काही स्वतंत्र गणराज्य निर्माण केले. 1869-1886 मधील काळात या प्रदेशात हिरे सोन्यांच्या खाणी शोधण्यासाठी युरोप, आफ्रिका, भारत देशातुन मोठ्या संख्येने लोक दक्षिण आफ्रिकेत

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



चित्र. 15.8: बोअर युद्ध

वसाहती करण्यासाठी आले. येथील खाणीचा शोध लावुन मोठ्या प्रमाणावर लाभ मिळावा अशी त्यांची आपेक्षा होती. बोर्यल च्या स्वातंत्र्याला धुडकावुन खाणीच्या प्रदेशात आपले वर्चस्व प्रास्थापित करावे म्हणुन ब्रिटीश सरकारने विचार केला. सध्या दक्षिण आफ्रिका म्हणन ओळखला जात असणाऱ्या अधिक प्रदेशावर आपले राज्य प्रास्थापित करण्यासाठी दोन युध्द इंग्लडने केले होते. हे युध्द 1902 मध्ये समाप्त झाले. दक्षिण आफ्रिकेतील प्रदेशांना मिळुण दक्षिणण आफ्रिका एकीकरण ब्रिटीशाने हे एकीकरण केले. त्या वेळेस दक्षिण आफ्रिकेत अनेक लोक युरोप वरुन वसाहत करण्यासाठी आलेले (मुख्यत: इंग्लड, डच, लोक) आफ्रिकेतील काळ्या वर्णाचे लोक भारतीय चिनचे राहात होते. युरोपीय म्हणुन ओळखले जात होते. लोकसंख्येत 20% असणाऱ्या लोकांना सरकार प्राध्यान्यता देऊन शासकीय व्यवस्था प्रशासन इंग्लडने निर्माण केले होते. मतदान सारखे नागरीकांचे अधिकार श्वेत जातीनां देऊन काळ्या जातीच्या (75% लोकसंख्या) भारतीय 5% यांच्या वर भेदभाव अन्याय करत होते. मुळ स्थानिक आफ्रिकन लोकांवर भरपुर कर लादत होते. त्यांनी शोधुन काढलेले राहण्याच्या भागातच त्यांनी राहावे अस त्यांना सिमीत केले. उरलेल्या भाग श्वेत जातीच्या (गोऱ्या वर्णाच्या) लोकांना देण्यात आला होता. त्यातील काळ्या जातीच्या लोकांच्या जमिनी विकत घेऊ शकत नव्हते. या प्रकारे पुर्ण 90% श्वेत जाती लोकांच्या स्वाधीन झाली होती. श्वेत वर्णाचे इंग्रज लोक शेतीचा क्षेत्र खाणीत काळ्या जातीच्या आफ्रिकनांना भारतीय काम करण्यास अनेक प्रकारचे अधिकार, स्वातंत्र फिरण्याचे अधिकार, संघटना स्थापना करण्याचे अधिकार त्यांचे दुख, कष्ट सांगण्याचे अधिकार सुध्दा नव्हते. जातीच्या नावाने लोकसंख्येत अधिक प्रमाणात दाखविलेली भेदभाव जातीच्या भेदभाव करणे म्हणतात. आफ्रिकन लोकांसाठी संपुर्ण 20 व्या शतकात या विरोधात लढले. शेवटी 1994 मध्ये जातीय भेदभाव समुळ नष्ट करण्यात आला.

तुम्हास हे आढळून आलेच असेल की, 1400 पासुन युरोपला वगळता, सगळे खंड - जसे संपुर्ण अमेरिका, आफ्रीका, आशिया आणि आस्ट्रेलिया - ह्या सर्वांवर युरोप सत्तांनी वसाहती निर्माण केल्या होत्या, यांनी आपली राजनीतिक आणि आर्थिक नियंत्रण ह्या देशांवर व जनतेवर लादून त्या लोकांचे जीवनच बदलून टाकले होते. अशाच पद्धतीत आणि अशाच परिणात ते ते स्वत: कोलोनाइज्ड झाले नाही. तुमच्या पाहण्यात आले की, कशाप्रकारे अमेरिकेतील बऱ्याच मोठ्या प्रमाणात स्थानिक लोक मारले गेलेस लुटले गेले आणि गुलाम झाली. कशाप्रकारे युरोपचे लोक तेथे स्थायिक झाले आणि कशाप्रकारे आफ्रिकेतून लाखों लोकांना गुलाम बनवून अमेरिकेत स्थायिक होण्यास भाग पाडले. तुम्हाला हे पण माहित आहे की, भारतातील लोकांवर त्यांनी कसे नियंत्रण केले, पण त्यांना मारले नाही. किंवा गुलाम बनविले नाही, किंवा मोठ्या संख्येत भारतात स्थायिक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

होणयाचा प्रयत्न केला नाही त्या उलट त्यांनी भारकतातील नैसर्गिक साधन संपत्तीवर नियंत्रण स्थापित करण्याचा प्रयत्न केला. ह्या माध्यमातून - कृषीवर कर, कमी किमतीत कच्चा माल खरीदने आणि त्याचबरोबर त्यांचे औद्योगिक उत्पादने भारतात विकणे. यामुळे भारतीय कलाकार आणि शेतकरी दारिद्र झाले. दुष्काळात लाखों लोक मरण पावले. लाखों लोकांना दक्षिण पूर्व आशिया, वेस्ट इंडिज, आफ्रिका इत्यादीच्या मळ्यात गुलाम म्हणुन काम करावे लागले. युरोपच्या लोकांना चीनवर संपुर्ण रायकिय नियंत्रण पण स्थापित केले नाही, पण जिथे जिथे त्यांना मुक्तपणे व्यापार करता येत होता, तिथे-तिथे अनेक क्षेत्रावर प्रभाव स्थापित केले.

अशा प्रकारे युरोपीयदेशांच्या लाभासाठी योग्य वसाहतीतील लोकांचे आर्थिक सामाजीक जिवन त्या देशांनी बदलविले. तसेच वसाहती प्रदेशानां स्वातंत्र्य,लोकशाही या तात्विक भावना त्यांच्या पोहचु नये हे करु शकले नाही. या पर्यंत तात्विक भावना वसाहती प्रदेशातील लोकांस एक नविन ओळख अधिकार मिळाला त्यामुळे त्या लोकांनी वसाहती प्रशासनाची लढाई करुन शेवटी स्वातंत्र प्राप्त केले.

## महत्वाचे शब्द

| | | |
|---|---|---|
| 1. वसाहती प्रशासन | 2. लॅटीन अमेरीका | 3. ओट्टोमन साम्राज्य |
| 4. संशोधन | 5. जातीभेद | 6. हॉसियाडा |
| 7. मर्नो सिध्दांत | 8. आफुचे युध्द | |

## तुमच्या अभ्यासात सुधारणा

1. वसाहती प्रदेश बनविण्यामागे व्यापारांनी महत्वाची भुमिका निभावली. तुम्ही सहमत आहात का? का? (AS1)
2. वसाहती प्रशासनामुळे विविध देशातील मुळ स्थानिक लोकांचे जिवन कसे प्रभावित झाले? तीन खंडातील एक एका विषयी खालील पार्श्वभुमी वर आधारीत लिहा. पिकविणारा पिक, धर्म, नैसर्गिक संपत्तीचा उपयोग. (AS1)
3. चिन, भारत, इंडोनेनिया वर वसाहती प्रशासनाच्या धोरणाविषयी लिहा त्यांच्यातील साम्य व फरक कोणता? (AS1)
4. जगाच्या नकाशात पोर्तुगिज, डच, ब्रिटीश आणि फ्रेंच वसाहती दाखवा व ते वेगवेगळ्या रंगानी भरा. (AS5)

## प्रकल्प कार्य

तुम्ही ब्रिटन नागरीक असता तर वसाहती प्रशासनाचे समर्थन करता का? कशासाठी? भारत देशाचे नागरीक म्हणुन वसाहती प्रशासन पाठिंबा देता विरोध करता? तुमचे विचार थोंडक्यात लिहा?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

धडा
16
# भारतावर वसाहतवादाचा प्रभाव

आठव्या वर्गात आंध्रप्रदेशातील जंगलावर पलायनवाद विधांनाचा प्रभावाचा अभ्यास केलात. या धड्यात पलायनवाद जंगले, कारखाणे, कामीक विधाने, देशातील विविध प्रांतातील लोकांच्या जिवनाला कशा प्रकारे प्रभावित केले पाहु या.

## ब्रिटीश प्रशासनाच्या अगोदर जंगलाचा उपयोग

कित्येक वर्षापासुन जंगलामध्ये निवास करणारे आदिवासी त्यांच्या भोवताल राहणारे ग्रामिण प्रजा त्यांच्या दैनंदिन जिवनाशी लागणाऱ्या अनेक वस्तु जंगलापासुन हस्तगत करीत होते. एक प्रकारे जंगलाचे तेच मालक होते. शिकारीसाठी कंद, फळे, फुले,मुळे गोळा करण्यासाठी जणावरांना चारण्यासाठी जंगलांचा उपयोग करायचे. घर बांधण्यासाठी अवजारे तयार करण्यासाठी जंगलातुनच सांगवान तोडुन आणायचे. या वस्तुंचा व्यक्तीगत गरजेसाठी उपयोग करायचे बाजारातुन मिठ, लोंखडासारख्या वस्तु विकत घेण्यासाठी जंगली उत्पादनांना विकायचे. फायद्यासाठी जंगलात मिळणारे सागवान इतर वस्तु विकत नसायचे.



*चित्र. 16.1: तेलंगानातील जंगल*

शेती जमिनीसाठी सुध्दा शेतकरी आदिवासी लोकांत संघर्ष असुन सुध्दा जंगलाखाली विस्तार भुभाग असायचा. या जंगलांचा उपयोग करुन सुध्दा आदिवासी शेतकरी त्यांचे संरक्षण करायचे. त्यांना तोडुन सागवानाची आव्शकता असल्यास असली तेव्हाच तेव्हा फक्त मोठी झाडे तोडुन नविन झाडांना वाढवायचे जसे म्हटले तसे मोठ्या प्रमाणात जंगल तोड त्यांनी केली नाही.

जंगल नष्ट न होता थोड्या भागातच फक्त झाडे तोडायचे.

जंगलात राहणारे लोक राजांना,

- ब्रिटीश शासनाअगोदर आदिवासी जिवनमान जंगलाना ते उपयोग करुन घेतलेल्या पध्दती माहित करा?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

महाराजांना केव्हा केव्हा हत्तीचे दांत, प्राण्यांची कातडी, मध सारख्या मौल्यवान वस्तु भेट म्हणुन द्यायचे. जंगलात शेती करणारे लोक कर सुध्दा भरायचे आदिवासीमध्ये अनेक लोक *झूम* शेती करायचे. जंगलात राहणारे लोक राज्यच्या सुरक्षीततेल धोका नसेपर्यंत राजा, महाराजांना त्यांना एकटे सोडायचे जंगलाचा कसा उपयोग करुन घ्यायचा असा कायदा करायचे नाही. अशा प्रकारे त्यांच्या दररोजच्या गरजा जंगलापासुन भागतच त्याचे संरक्षण करीत आदिवासी जंगलात शतकानुशतके निवास करीत आहेत.

## ब्रिटीश राजवटीत जंगलांचा उपयोग How Forests Were Used During British Rule

ब्रिटीश राजवटीमध्ये ही परिस्थिती बदलली. त्यावेळस कोलकत्ता, मुबई सारख्या मोठे शहरांची निर्मीती होत होती. सरकार देशभर हजारों किलोमिटर रेल्वे मार्ग निर्माण करीत आहे. मोठ मोठ्या जहाजांना तयार करीत आहेत. खाणीचे खणने चालु करीत आहेत. या सर्वांसाठी मोठ्या प्रमाणात सागवान पाहिजे. त्याच्याकडे सागवानाचा वापर वेगाने वाढला.



चित्र. 16.2: चित्तगोंग पहाडी भागाच्या, कसालॉग नदीत बांबूचे वाहते गठ्ठे

### रेल्वेमार्गाला स्लिपरस Sleepers for Railway Lines

1879 मध्ये भारतात सुमारे 8000 किलोमिटर रेल्वे मार्ग निर्माण झाले. 1910 पर्यंत 50,000 किलोमिटर पेक्षा जास्त रेल्वेमार्गाची पुर्तता झाली. दरवर्षी हे नविन रेल्वेमार्ग टाकण्यासाठी एक कोटी पेक्षा जास्त सागवानांच्या झाडाची तोड आवश्यक असायची.

**Sleepers:** *लाकडाचा लांब पातळ सपाट तुकडा जो रेल्वे रुळाखाली वापरला जातो. आणि रुळाला स्थिरता देतो.*

या स्लिपरांना आवश्यक असणारे सागवान हिमालय, तराई प्रांताच्या जंगलातुन तोडायचे. इमारती, जहाज, खाणीसाठी, सुध्दा सागवान मोठ्या प्रमाणात तोडुन पुरवठा करायचे. सांगवानाचे व्यापारी जंगलाचे ठेकेदारांनी नेमणुक केलेले मजुर जंगले तोडायचे

या व्यापारात ब्रिटीश शासन ब्रिटीश व्यापारीयांनी मोठ्या प्रमाणात कायदा मिळविला. जंगलतोडीसाठीच्या हक्काला शासन व्दारे विकायची. हटरासाच्या बोलीत जंगलाला हस्तगत करण्यासाठी ठेकेदार मोठ्या प्रमाणात पैसे भरायचे. त्यामुळे हरास बोली व्दारे शासनाला खुप आमदानी यायची.

### जंगले धोक्यात आणि नवी झाडे लावण्याची गरज Forests in Danger and the Need to Plant New Trees

- सागवानाच्या स्लिपरचा उपयोग का करत होते? आजच्या काळात सागवानाच्या स्लिपरचा उपयोग होता का? यावर चर्चा करा? त्यातील फरक सांगा?

सागवानाच्या व्यापार वाढत असल्यामुळे ब्रिटीश शासन गोधळात पडले. जंगले इतक्या वेगाने तोडल्याने भविष्यात रेल्वेमार्ग, जहाज, इमारीतींना लागणारे सागवान कोठुन



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



*चित्र. 16.3: छोटा नागपूरमझील सिंगभूम जंगलातील साल झाडाच्या लाकडाचे स्लीपरमध्ये रुपांतर, मे 1897*

*वनविभागानी नियूक्त केलेले आदिवासी लोक झाड कापनी गुळगुळीत अशी फळी तयार करतात जे रेल्वेमध्ये स्लीपर म्हणून वापरलेले जातात. पण स्वत:चे घर बांधण्यासाठी ही झाडे त्यांना कापू देत नाहीत.*

मिळणार ?सतत सागवान मिळण्यासाठी काहीतरी केले पाहिजे असा शासनाने विचार केला. जंगलतोडीला बळी पडणाऱ्या जंगलाच्या बदल्यात नविन झाडे लावण्याच्या निर्णय केला. सामान्य लोकांना उपयोगी पडणारी आंबा, मोह, लिंबा सारखे झाडे लावण्याची इच्छा शासनाला नाही. बाजारात जास्त मागणी असणाऱ्या सागवान लाकूड देणारी झाडे लावयची समजले. त्यांच्यामुळे कटाई केलेल्या जंगलाच्या जागी, टेक, पैन, सारखी झाडे लावलीत.

## वनविभागाला निर्माण केलेले शासन The Government sets up a Forest Department

सर्वात मुख्य विषय म्हणजे 1864 मध्ये शासनाने वनविभागाची स्थापना केली. नविन रोपन करण्याऱ्या जंगलाचे रक्षण करण्यासाठी वनविभागाने नविन कायदा नियमांची निर्मीती केली. या कायद्याव्दारे याच्या पहले असणारे जंगले लोप न पावता अती काळजीपूर्वक झाडे तोडण्याचा कार्यक्रम करण्याची वनविभागाने प्रयत्न केला. या कायदे नियम जंगलावर शासनाच्या नियंत्रणासाठी मदत केली. जंगलात जंगलाजवळ राहणाऱ्या लोकांपासुन जंगलाची वन विभागाने विचार केला.

## आदिवासी उठाव Adivasi Revolts

ब्रिटीश काळात जंगलात राहणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांची परिस्थिती कशाप्रकारे खालावली पाहिलात मध्यप्रदेश छत्तीगड मध्ये राहणारे वैगा, मुरीया,गोंड, भिल्ल, जाती आंध्रप्रदेशातील असणारे कोया, रेड्डी, कोलाम जाती ओडीसातील सबर आदिवासींना त्यांच्या जुन्या पध्दतीने शेतीकरणे ते वनविभाग किंवा ठेकेदाराजवळ मंजुरासारखे काम करावे लागत असे. किंवा व्याज व्यापारी बाहेरुन आलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात वेट्टी कार्मिकात बदलायचे.

रोड, रेल्वे निर्माण झालेल्या प्रांतात बाहेरुन येणारे लोक आदिवासी भागात स्थिर होऊन त्यांच्या जमिनीना हस्तगत करणे सोईचे झाले. वनविभागाचे अधिकार देखील वाढले. दंड लादणे, लहान लहान कारणाखाली लोकांना मारणे, लोकांच्या घरात जबरदस्तीने प्रवेश करुन त्यांच्या वस्तु ओढुन घेंणे, स्त्रियांसोबत असभ्य प्रवर्तन करणे, लाच घेणे, मजुरी न देता वेटटी काम करवुन घेणे. या सारखे साधारण विषय झालेत.

अशा प्रतिकुल परिस्थितीच्या विरोधात आदिवासी अनेक प्रांतात प्रतिघटीत झाले. या प्रतिघटनेत पोलीस स्टेशन, वनविभाग केंद्र, व्याज घेणाऱ्या व्यापाराऱ्याच्या मागे



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

लावायचे. कित्येक वेळा संपुर्ण जंगलाला आग लावायचे. अशा प्रकारचा उठाव 1856 मध्ये झारखंड मधील संताल आदिवासीयांनी, 1880 आणि 1922 मध्ये आंध्रप्रदेशातील कोया आदिवासींयांनी, 1910 मध्ये बस्तरचे मारिया आणि मुरीया आदिवासी, तसेच गोंड आणि कोलाम आदिवासी 1940 मध्ये केला होता.

### संतालाचा उठाव The Santhal Revolt

झारखंड मधील संताल आदिवासी पाहिल्यापासुनच ब्रिटीश प्रशासनाला निषेध करीत होते. 1855 -56 मध्ये संतालानी मोठ्या प्रमाणात उठाव केला. जमिनदारांना व्याज घेणाऱ्यानां मारुन त्यांना लुटले. ब्रिटीश प्रशासनाचा अंत झाला म्हणुन संताल मध्ये स्वंतत्र राज्याची स्थापना करणार आहोत म्हणुन त्यांनी घोषणा केली. तर संतालाजवळ भाले, बाण, या शिवाय दुसरे कोणतेही हत्यार नव्हते. बंदुक असणाऱ्या ब्रिटीश सैन्याशी ते जास्त काळ टिकु शकले नाहीत. हे भयंकर युध्द संपेपर्यंत 15000 संताल आदिवासी मारले गेले. शेवटी या उठावाला दडपुन टाकण्यात आले.

### बिर्सा मुंडाच्या नेतृत्वामध्ये उठाव The Revolt Led by Birsa Munda

झारखंड राज्यामध्ये असणाऱ्या छोटानागपुर पठारभुमिमध्ये मुंडा आदिवासी बिर्सा (1874-1901) नावाच्या युवकाच्या नेतृत्वामध्ये ब्रिटीश शासनाचा अंत करण्याचा विचार केला. बिर्साला प्रजा देवासारखी समजायची, त्यांनी सांगीतलेली प्रत्येक गोष्टीचा ते आचरण करायचे. मुंडाना जंगलावर हक्क असु नये, त्यांच्या जमिनी त्यांना मिळु नये, असे केलेल्या न्यायालयांना व्याज घेणाऱ्या व्यापाऱ्यांना, जमिनदारांना, संरक्षण देणाऱ्या विदेशी सरकारला पळवुन मारण्याचा विचार केला. नेत्यांनी पकडुन तुरुगात टाकल्याने शेवटी मुंडांच्या उठाव दडपुन टाकला. 1900 मध्ये बिर्सा मुंडा तुरुंगातच मरण पावले. तर छोटानागपुर आदिवासीच्या हक्कांच्या रक्षणासाठी सरकारला काही कायदे बनविने चुकले नाही.

### कुमावु मध्ये जंगलाचा उठाव Forest revolt in Kumaon (1921-22)

उत्तरखंडामध्ये कुमावु प्रांतामध्ये जंगलावरील त्यांच्या हक्काला घेतल्याने शेतकरी वर्गाने सहकार्य करण्याचे नाकारले. वनविभागाच्या नियमांचे सगळ्यासमोर उल्लंघन केले. ठेकेदारांना दिलेल्या जंगलाना जाळण्याचा प्रयत्न केले. वनविभागाची वेठबिगारी करण्यास लोकांनी नकार दिला. या आंदोलनामुळे ब्रिटीश सरकारने त्याच्या पध्दतीला बदलावे लागले. अनेक प्रांतात नियमांना थोडी मुभा दिली. काही प्रातांत बाहेरुन आलेल्या लोकांनी आदिवासींच्या जमिनी विकत घेऊन नये असे नविन कायदे बनविले.

### अल्लुरी सितारामा राजु Alluri Seetha Rama Raju



विशाखापट्टनम जिल्ह्यात पंड्रगी गावात 1897 जुलै 4 ला रामाराजुचा जन्म झाला. त्यांच्या आईचे गाव विशाखापट्टम वडीलांचे गाव भिमावरम जवळील मोगल्लू होते. त्यांचे वडील राजमंड्री सेट्रल जेलमध्ये अधिकारीक फोटोग्राफार म्हणुन काम करीत होते. राजु शाळा शिकत असतांना वडील मरण पावल्याने रामचंद्र राजु मामाजवळ वाढले.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

1882 मध्ये मद्रासने वन कायदा केल्याने त्यांच्यामुळे आदिवासींना जंगलामध्ये स्वतंत्र फिरण्यास सक्त मनाई केली. परंपरागत करीत आलेल्या पोडू शेतीला करु दिले नाही. पुर्व गोदावरी, विशाखापट्टनम, सरहद्दी प्रातांत राजुने आदिवासी उठावाचे नेतृत्व केले. बंगाली, क्रांतीकारांच्या देशभक्तीची स्फुर्ती होऊन चिंतपल्ली, रंपाचोडवरम, दम्मनपल्ली, कृष्णदेवीपेटा, राजवोभंगी, अड्डुतिगला, नर्सीपट्टनम, अन्नवरम सारख्या प्रांतात पोलीस स्टेशनवर राजुने अयात हल्ला केला. राजु त्यांच्या अनुमायीनी बंदुका, दारुगोळा चोरल्या. दम्मनपल्ली जवळ जवळ स्काट कंवार्डसहीत अनेक ब्रिटीश सैनिकांना बंडखोरांनी मारुन टाकले. 1922 डिसेंबर मध्ये सांडर्सच्या नेतृत्वाखाली असाम रायफल कंपनीला ब्रिटीश सरकारने पाठविले. त्यांनी पगडपल्ली जवळ मुक्काम ठोकला. त्यावेळेस भुमिगत असणारा राजु चार महिण्यानंतर पुन्हा बाहेर आला. मल्लु दोरा, गंटदोरा, सारख्या आदिवासींच्या नेतृत्वाखाली आदिवासी दल निर्माण करुन बानांनी लढा चालु ठेवला.

या बंडाला दडपुन टाकण्यासाठी ब्रिटीश सैन्याला 1922 पासुन एक वर्ष लागले. चिंतपल्ली जंगलात रामाराजुला पकडलेल्या ब्रिटीश सैन्यानी कोयूर गावा जवळील मंपागावात 7 मे 1924 रोजी त्याला ठार मारले.

### कोमराम भिम Komaram Bheem

आदिलाबाद (सध्या कोमराम भीम) जिल्ह्यात संकेपल्ली गावात 1990 मध्ये कोमराम भिमच्या जन्म झाला. जेव्हा त्यांचे वय 15 वर्षाचे होते तेव्हा वनविभागाच्या हल्ल्यात त्यांचे वडील मरण पावले. त्यामुळे भिम कुटुंब केरामेरी मंडल मधील सर्दापुर गावाला स्थलातरीत केले.



झुम पध्दतीने शेती करीत आपले जीवन व्यतीत करीत असतांना निजामाच्या खबरी असणारा सिद्दीकी नावाच्या जागीरदारांनी भिमच्या जमीनीवर ताबा केला. क्रोधाने भिमने त्याला मारुण टाकले. पोलीसांना चुकवुन आसाम मध्ये जाऊन लपला. तिथे कॉफी, तंबाखुच्या बघीतल्यात कामगार म्हणुन पाच वर्ष काम केले. तिथे कामगारांचे आंदोलन पाहला. वाचन लिहीने शिकले. त्यांचा मित्र कोमरम सुरु पासुन. त्यांच्या प्रांतात घडणाऱ्या परिणामा बद्दल जेव्हाच्या तेव्हा भिमला माहित करुन घेत होता. विशाखापट्टनम मधील अल्लुरी सिमाराम राजुच्या आंदोलनापुसन बिर्सा मुंडाच्या उठावा पासुन भिमने स्फुर्ती घेऊन निजामाच्या विरोधात आंदोलन सुरु केले. जंगलात जणावरास चारल्यास स्वयंपाकासाठी जलळत गोळा केल्यास निजाम सरकारने बंमब्रम नावाचा कर वसुल करीत असायचे. हा कर बांधायलचा नाही त्यांचा हक्क जातीच्या स्वातंत्र्यासाठी लढायच म्हणुन कोमराम भिम नी दिलेल्या जल जंगल जमीन आवाजाला आदिवासींनी प्रतिसाद दिला. जमिनीसाठी आदिलाबाद मधील 12 गाव लढण्यास तयार झाले. गोंड, कोया, युवकांपासुन उपयोगामध्ये भिमने गेरील्ला सैन्य तयार केले. शास्त्राच्या उपयोगांमध्ये आदिवासी प्रजेला शिक्षण दिले.

जोडेघाटला केंद्र स्थान करुन भिमने त्याचे गेरील्लायुध्द सुरु केले. या हल्यामुळे आश्चर्यचकीत झालेले निजाम सरकारने आदिवासींना दडपुन टाकण्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले. शेवटी जोडघाट जंगलात एका पौर्णिमेच्या दिवशी निजाम सैन्याशी चालत असलेल्या लढाईत कोमराम भिमला विरमरण प्राप्त झो. त्यानंतर आदिवासींच्या जिवन पध्दतीचा अभ्यास करण्यासाठी निजाम सरकारने हेमडार्फला नियुक्त केले.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## ब्रिटीश सरकारचे औद्योगिक धोरण The British Government's Industrial Policy



चित्र . 16.4: कलकत्तामधील कांही मारवाडी व्यापाऱ्यांचे चिक्ष

1850 मध्ये प्रथम मुंबईमध्ये त्यानंतर अहमदाबाद मध्ये कितीतरी साहय्याने भारतीय कापडे गिरण्यांची स्थापना झाली. अशा प्रकारे भारतात देखील. यंत्राव्दारे कापड तयार करणे सुरु झाले. इग्लंड पासुन आयात होणाऱ्या कपंड्यार विशिष्ट कर लवण्यास भारतात तयार होणाऱ्या कापडला सुरक्षित मार्केट मिळतील असा काही सुरक्षित लोकांनी आणि कारखाण्यांच्या मालकांनी अशी मागणी केली. या विशिष्ट करामुळे ब्रिटीशांपासुन येणाऱ्या कापडाची किंमत वाढल्यामुळे भारतीय कारखाण्यात तयार होणाऱ्या कपडांची विक्री वाढतील.

ब्रिटनमधील वस्त्रोद्यागाला मदत करण्यासाठी भारतीय विणकरांनी तयार केलेल्या कापडावर ब्रिटीश सरकार विशिष्ट कर लावली म्हणुन तुम्हाला माहित आहे. तर भारत देशातील ब्रिटीश कापडावर अशाप्रकरचा कर लावण्यासाठी शासनाने नकार दिला. सरकारवर ब्रिटीश कारखाण्याचे मालक, व्यापारीयांचा दबाव जास्त असल्यामुळे त्यांच्या फायद्यांच्या विरोधात काहीच करु शकले नाही.

1896 मध्ये भारत देशातील ब्रिटीश सरकारची आमदानी मोठ्या प्रमाणात कमी झाली. त्याच्या आमदनीला वाढविण्याच्या मार्गाबद्दल शासन विचार करायला लागले. कष्टक़ाळात ब्रिटनतुन भारताला येणाऱ्या कापडावर सरकार 3.5% कर लावली. या प्रक्रियेमुळे ब्रिटीश कापडाची विभिन्न धक्का न लागु नये म्हणुन तेवढेच कार 3.5 टक्के भारतात तयार होणाऱ्या कापडावर देखील लावला.

भारताची प्रजा, ब्रिटीश सरकार मधिल या करामुळे दिर्घकाळ संघर्ष चालत राहीला. भारत देशातील उत्पादनावर कर लावल्यामुळे ब्रिटीश उद्योगाच्या फायद्यायाचे रक्षण करणे. सरकारचा मुख्य उद्देश आहे. हे स्पष्ट झाले. या करावर भारत देशात तिव्र विरोध होता. त्याला काढुन टाकावे लागले. असे दिर्घ प्रयत्न होते.

सरकारची मदत नसुन देखील भारतात कापड सुत, साखर, कागद, आगपेटी,सिमेंट सारखे कारखानाची स्थापना झाली. 1914 नंतर खुप मोठ्या प्रमाणात विकास झाला.

- सुरक्षित मार्केट म्हणजे काय चर्चा करा?
- भारताला येणाऱ्या ब्रिटीश वस्तुवर कर लावला म्हणुन भारतीयांनी मागणी केली. ही न्यायपुर्ण मागणी होती का? भारतीय ब्रिटीश सरकारची उद्योगाशी सरकार समान वागणुक होते का?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## पाहिल्या महायुध्दाच्या वेळेस भारतीय उद्योग Indian Industry During The First World War

पहिल्या महायुध्दाच्या वेळेस ( 1914 ते 1918 पर्यंत) भारत देशातील विदेशी वस्तुंची आयात मोठ्या प्रमाणात पडली. मालवाहु जहाजांना युध्द कामासाठी वळविल्यामुळे जहाजांची कमतरता पडणे हे कारण तेवढेच नाही तर युरोप कारखाण्यामध्ये युध्दासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंची उत्पादन केल्या गेले. त्यामुळे भारतदेशातील मार्केटसाठी तयार करणाऱ्या वस्तु कमी झाल्या.



चित्र. 16.5: दिल्लीमधील बँकरचे जून चित्र

या परिस्थितीत, भारत देशात स्थापीत झालेल्या कारखान्यांनी त्यांच्या वस्तु विक्रीच्यामुळे उद्योगामुळे वेगाने विस्तार झाला. भारतदेशातील कारखान्यांना युरोप वरुन यंत्रे आयात करुन नविन उद्योगाची स्थापना केल्या गेली. भविष्यात देखील भारतीय वस्तु मोठ्या प्रमाणात विकण्यासाठी विदेशी वस्तुवर कर लावण्यासाठी भारतीय उद्योजक सरकारवर तिव्र दबाव आणण्यात आले.

अनेक कारणामुळे सरकारला या मागण्या मान्य कराव्या लागल्या. 1917 नंतर एका नंतरच्या एक अनेक विदेशी वस्तुवर कर लावत गेले. या कारणाने भारत देशात स्थापित झालेल्या कारखाण्याची वेगाने प्रगती झाली.

- पहिल्या विश्व युध्यात भारतीय कारखाण्याचा विकास जोरात का झाला ?

## भारत देश स्वातंत्र्यच्या वेळेस भारतीय उद्योगाच्या समस्या

सुदिर्घ आंदोलनानंतर भारतीय उद्योगात ब्रिटीश सरकार पासुन थोडी मदत मिळाली. त्यावेळेस अनेक कारखाने बॅका, जहाजे सारखे भारताच्या हातात न राहता ब्रिटीश लोकांच्या हातात होते. त्यामुळे या कंपनीला कित्येक फायदे मिळाले. उदा. ब्रिटीश सरकारातील विविध स्तरांचे अधिकारी कर्मचारी त्यांना सोपे मिळण्या जोगे राहायाचे. ही सुविधा भारतीय कंपनीला नव्हती विदेशी व्यापार सर्व युरोप कंपनीच्या हातात असल्यामुळे त्यांना कोणत्याही निधिची कमतरता नव्हती.

विदेशी कंपनीचा प्रभाव असतांना देखील भारतीय उद्योगपतींनी खुप प्रगती केली. उदा. कापड उद्योग भारतीय उद्योगपतीच्या हातात होता. भारतीय उद्योगपतींनी साह्य केलेल्या मोठ्या विजयात जमशेदजी टाटा या उद्योगपतीची जमशेदपुर येथे स्थापन केलेल्या



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



चित्र. 16.6: भारतातील आद्यप्रवर्तक उद्योगपती J.N.Tata, R.D.Tata, Sir R.J.Tata आणि Sir D.J. Tata.

स्टिल(पोलाद) कारखाना पहिले होते. भारतीय उद्योगपतींना विदेशी वस्तुवर कराच्या रुपात सरकारपासुन मिळणारी मदत महत्वाची होती. परंतु तिच फक्त पुरत नव्हती. रेल्वेमार्ग, रस्ते, विद्युत, कोळसा, लोह सारख्या अनेक साधनांची सवलीची गरज होती. पंरतु ब्रिटीश सरकारने या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी पाहिजे ऐवढे लक्ष दिले नाही. भारतीय उद्योगपतींना त्यांना पाहिजे ती यंत्रणा विदेशामधुन विकत घ्यावी लागते असे. यंत्राना तयार करण्याच्या स्थापना भारत देशात अजुन देखील झाली नव्हती.

उद्योगाधंद्याच्या प्रगतीसाठी शास्त्रज्ञाची, इंजिनिअरची, तंत्रशास्त्र मदतीची आवश्यकता होती. परंतु भारतदेशात शिक्षणाला पाहिजे ते महत्व दिले गेले नाहीत. भारतीय शास्त्रज्ञ, अभियंता संख्या कमी असल्यामुळे उद्योगाची अभिवृध्दी विदेशी लोकांवर आधारीत असायची. स्वातंत्र्यानंतर देखील शिक्षण पहिले महत्व न दिल्यामुळे, परिणामी कमी शिकलेली कार्मिक शक्ती उद्योग अभिवृध्दी मध्ये अडथळा निर्माण झाली.

भारतीय उद्योगाच्या फायद्यासाठी ब्रिटीश काळात देखील उद्योगपतींची अनेक संघटना निर्माण झाली. यापैकी मुख्य म्हणजे भारतीय व्यापार उद्योग Federation of Indian Chambers of Commerce and Industries (FICCI) या सारख्या संस्था उद्योगपतीच्या समस्या, सरकार समोर ठेवायच्या भारत देशात ब्रिटीश शासनाच्या अंत झाल्यावर स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वदेशी सरकार निर्माण झाल्यामुळे परिस्थिती बदलली. भारत सरकारने उद्योगाला नियोजनत्मक प्रोत्साहन दिले.

- ब्रिटीश शासनात भारतामध्ये कोणत्या उद्योगाची स्थापना झाली?
- स्वातंत्र्याच्या काळात भारतीय उद्योगाच्या विकासात कोणत्या समस्या निर्माण झाल्या?

## भारतीय उद्योगातील मजुर

### औद्योगिक शहरी आणि मजुरांच्या वसाहती Industrial Towns and Labour Settlements

1850 पासुन भारतात यंत्र आधारीत उद्योगाची स्थापना करण्यात आली. सर्वात मोठा उद्योग म्हणजे कापड उद्योग, हातमाग आणि कापड विणने होता. 1905 पर्यंत वस्त्र उद्योगात 2.25 लाख कार्मिक काम करायचे. ज्युट उद्योगात 1.5 लाख लोक आणि कोळसा खाणीत एक लाख लोक काम करायचे. गरज असलेले शेतकरी, मजुर, कारागीरांची काम मिळेल या आशेने खेड्यामधुन शहरात स्थलांतरास सुरुवात झाली. त्यांच्या सोबत किंवा त्यांच्या मागे त्याचे नातेवाईक, शेजारी, आणि त्यांचे मित्र आले. शहरात कामागारांची



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

संख्या वाढली. कारखाण्याच्या सभोवताली कार्मिकांच्या झोपड्या, घरे, निर्माण झाल्या. भारतात. कानपुर, मुंबई, अहमदाबाद, कोलकत्ता, चेनई या सारखे अनेक शहरे मोठ्या औद्योगिक शहरात बदलली.

**कामाची शर्ते / अटी Work Conditions**

पहिल्या दशेमध्ये काम दररोज सुर्यदिया पासुन सुरु होऊन सुर्यास्त नंतरच बंद व्हायचे. सकाळ व्हायच्या पहिलेच कामगार झोपेतुन उठुन कारखाण्याकडे जायचे जिथे मोठी रांग लावलेल्या कामगारात त्यांच्यात पुरुषांसोबत स्त्रियां, मुले सुध्दा राहायाचे. एकदा यंत्रावर काम करणे सुरु केल्यानंतर ते थांबविण्याचा प्रश्नच नव्हता. जेवण्यासाठी सुध्दा सोबतच्या कामगारांना काम सोपवुन 15-20 मिनीटात कामगार आपले जेवन संपावयाचे. जेवनानंतर सुध्दा खास विराम राहायचा नाही. जेवणासाठी खास वेगळी जागा देखील राहायची नाही.

कारखाण्यातील उष्णता, आद्रता, आवाज, धुळ आणि गुदमरल्या सारखे व्हायचे यातच दिवस जायचा. कारखाण्याच्या वातावरणात व्यवस्थीत श्वास घेता येत नव्हता. सुर्यास्तानंतरच अंधारात बघने आवश्यक होत होते. तेव्हाच मशीन बंद करायचे आणि काम थांबायचे अशा प्रकारे महिनो शी चालत असे. नियमामध्ये हप्त्याला एक दिवस सुट्टी देखील नव्हती. वर्षाला मोठ्या सनाच्या दिवशी फक्त मिल मालक सुट्टी द्यायचा. तर वर्षातच सर्व दिवशी काम करणे शक्य नसते. आरोग्य समस्या असते. कुटुंबातील हजर राहणारे काही कुटुंबातील कार्यक्रम असतात. एकच काम सतत केल्याने कामगार दमायचे. आणि पुर्ण थकुन जायचे. परंतु जेव्हा एखाद्या दिवशी कामगार कामाला न गेल्यास, त्या दिवशी त्याला मजुरी मिळत नव्हती. त्या दिवसात उत्पादीत केलेल्या वस्तुला पाहुन मजुरी दिली जात होती. तर जेवढे उत्पादन तेवढी मजुरी सारखा नियम मालकांनी लावला. केव्हा केव्हा यंत्र काम करायचे नाही किंवा कच्चा मालची पुरवठा विलंब लागायचा किंवा अपुऱ्या पुरवठा व्हायचा. जरी ही चुक किंवा जबाबदारी कामगारीच नसतांही देखील मिल मालंक त्यांच्या पगारात कपात करायचे. त्यामुळे कामगारांना दरमाह स्थिर उत्पन्न राहायचे नाही

तेवढेच नाही तर महिणा संपल्यानंतर देखील कामगारांना मिलमालक पुर्ण मजुरी द्यायचे नाही. दुसऱ्या महिण्यापर्यंत काही पैसे त्यांच्या कडे ठेऊन घ्यायचे. अशा परिस्थितीत मजुरांना काम बंद करुन दुर जाणे शक्य नसायचे कारण त्यांच्या पाहिल्या महिण्याची मजुरी मिलमालका जवळ राहायची.

एवढेच नाही तर दंड आकराण्यात येत असत. प्रत्येक छोट्या विषयाला कामाला उशिर झाले, म्हणुन कपडा खराब आला म्हणुन, कामगार मनलावुन काम करीत नाही म्हणुन, मालकाला वाटल्यास दंड लावुन कामगारांना महिण्याला येणाऱ्या वेतनातुन कमी वेतन द्यायचे. सर्व कामगार पुरुष, स्त्रिया, मुले अशा परिस्थितीत उन्हाळात 14 तासांपर्यंत, हिवाळ्यात 12 तासापर्यंत काम करावे लागत असे. 1880 मध्ये एक नविन घडले. मिल मध्ये विद्युत बल्ब लावयला सुरुवात केले. उजेड असणारी वेळ वाढल्यामुळे कामाचे तास देखील वाढायचे. आता सुर्यास्त झाला म्हणुन काम थांबवायची गरज नव्हती. प्रत्येक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



*चित्र. 16.7: पुरुष, स्त्रिया आणि मुले मील ला जात असल्याचे भीत्ती पत्रक*

कामगारांपासुन 15 तास काम करुण घेणे साधारण झाले. कामामध्ये अनेक त्रास्त असायचे. याच्या सोबतच नौकरीची कोणतीही सुरक्षीतता नव्हती. मील मध्ये नुकसान झाल्यास मिल मालक काही नौकरांना काढुन टाकायचे. काम करणाऱ्यांचे वेतन कमी करायचे यांच्या विरोधात जर मिळाल्या फायदा झाल्यास कामगांरानी वेतन मालक वाढविलात का? असे मात्र घडायचे नाही.

भारतातील कारखन्याच्या पूर्वीच्या दिवसात:

- कामगारांच्या कामाचे आणि विश्रांतीचे नियम कोणते होते?
- मजूरी देण्याचे नियम कोणते होते?
- मजूरांना मजुरी कमी देण्याची कारणे कोणती होती?

## कामगांराचे आंदोलन Labourers' Struggles

या दुर्भर कामाच्या परिस्थिती च्या निषेधात कामागरांनी आंदोलने केले. 1870 पासुन मुंबई मध्ये एकानंतर एक संप झाले. सुरुवातीला कामगारांचा संघटना नव्हता. मिल मध्ये कामगार संप करुन मालकावर दबाव काटायचे.

उदा. 1892 मध्ये मुंबई मील मालकांनी मजुरांचे वेतन कमी करायचा विचार केला. अशा परिस्थितीत सर्व कारखाण्यातील कामगार भांडण्यास तयार झाले. कारखाण्याच्या तपासणीसाठी एका अधिकाऱ्यांची नेमणुक केली. कामगाराबद्दल तपासणी बद्दल तपासणी अधिकारी अशा प्रकारे लिहीला. 'जर मजुरी कमी केल्यास संपुर्ण मुंबई मध्ये सगळी कडे संप होण्याची शक्यता आहे. कामगांराची एकत्र कामगार संघटना नसतांना देखील एकाच गावाचे असल्यामुळे एकाच जातीचे किंवा एकाच वंशाचे किंवा एकाच गावाचे असल्यामुळे ते सोप्यारितीने एकत्र होऊ शकतात आणी निर्णय घेऊ शकतात.' त्यांच्या फायद्यांचे संरक्षण करण्यासाठी कामगार लडण्याच्या पध्दतीचे एका उदा पाहु. 1900-1901 मध्ये मुंबई मधील 20 कारखाण्याच्या कामगांराचे वेतन 12.1/2 टक्के वेळा कमी केले. याच्या विरोधात 20,000 कामगरांनी कामे बंद करुन संपावर उतरले. 20 कारखाणे 10 दिवसापर्यंत



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

बंद पडले.

त्याच बरोबर 1919 मध्ये जिवनमान वाढयच परंतु कामगांराचे वेतन मात्र वाढत नव्हते. त्यामुळे मुंबईतील सर्व कारखाण्यातील कामगारांनी संप केल्यामुळे 12 दिवसांपर्यंत कारखाणे काम केली नाही. कामगार त्यांच्या वेतनाशीच नाही तर ब्रिटीशा पासुन भारताच्या स्वातंत्र्यासाठी देखील भांडायचे (आंदोलन) करायचे. 1908 प्रख्यात स्वांतत्र्यासेनानी लोकमान्य बाल गंगाधर टिळकांनी ब्रिटीश सरकारने सहा वर्षाची देश सोडुन पाण्याची शिक्षा ठोठावली त्याच्या विरोध करीत मुंबई कामगारांनी 6 दिवसांनी संपावर गेले. अशा प्रकारे संपाव्दारे कामगार स्वांतत्र्यांवर आंदोलनात भाग घेतले.

- कामगार संपावर का जात होते?
- इतर कार्यवाहीच्या ऐवजी संप पद्धतच का वापरण्यात आली.



*Fig. 16.8: कामगारांची सभा दर्शविणारे भित्ती पत्रक*

## कामगारांच्या समस्यांचे निवारण

आश्चर्यची बाब अशी की, भारतामध्ये अनेक विद्वान लोकांनी कामगारांच्या समस्यांकडे पुरेसे लक्ष दिले नाही. तथापी उद्योग धंद्यांची वाढ कशी व्हावी त्याविषयी मात्र सांगोपसांग चर्चा होत होती. कामगारांना असलेल्या समस्यांची दखल कोणीही घेतली नाही.

या ही पेक्षा आश्चर्यांची गोष्टी म्हणजे ब्रिटनच्या कारखाणदारांनी, व्यापारांनी आणि विचारंवतानी मात्र भारतातील कामगारांच्या विषम परिस्थितीची दखल घेत तिव्र चिंता व्यक्त केली. त्यांच्या समस्यांबाबत सरकारशी वाटाघाटी केल्या.

कामगारांच्या दयनिय परिस्थितीची सुधारणा होण्यासाठी ब्रिटनमध्ये अनेक कायदे अस्तित्वात होते. तसेच कायदे भारतामध्येही लागु व्हावेत यासाठी ब्रिटीश लोकांनी प्रयत्न केले. त्याचाच परिणाम म्हणुन भारतीय कामगारांना कामाच्या तासामध्ये सुट आणि साप्ताहिक सुटी लागु करण्यात आली यामुळेच कामगारांच्या हिताचे अनेक कायदे करणे सरकारला भाग पडले.

गमंतीचा भाग म्हणजे या सर्व सुधारणांना भारतातील पारिश्रामीकवेत्ते, विचारवंतानी मात्र विरोध केला. कामगारांना स्थिर उत्पन्न, सुटी सारख्या सवलती दिल्यातर त्याचा उत्पादनावर परिणाम होईल, कारखानादारांचा खर्च वाढुन भाव वाढ होईल. यामुळे याचे दुष्परिणाम जाणवतील. याचा परिणाम म्हणजे ब्रिटीन मधुन आलेल्या वस्तु सहज खपल्या जातील आणि भारतात उत्पादन झालेला माल विकणार नाही असे त्याचे मत होते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## कामगरांच्या कल्याणासाठी कायद काळ सुचिका

सरकारने प्रथम कारखाण्याच्या कायदा 1881 मध्ये बनविली. त्याच्या व्दारे खास करुन काम करण्याच्या मुलांसाठी खालील दिलेले नियम बनविले.

- सात वर्ष वया खालील मुलांना कारखाण्यात कामावर लावल्या जाऊ शकत नाही.
- 7-12 वर्षाच्या मुलांकडुन दररोज 9 घंट्या पेक्षा जास्त काम करुन घेऊ नये दररोज एक तास विश्राम द्यावी. त्यांना दर महिण्यात 4 दिवस सुट्‌या देण्यात याव्या.

1891 मध्ये महिला कामगार कल्याणासाठी कायदे केले त्या प्रकारे

- महिला कामगार दिवसात 11 तास पेक्षा जास्त काम करु नये
- महिला कामगांराना कामाच्या दिवसात कामाच्या दिडतास विश्रांती द्यावी.
- बाल श्रमीकास दिवसात 9 पासुन 7 तास पर्यंत कमी करावे. नऊ वर्षा च्या आतील मुलांना कामास लावु नये.

कारखाण्यात जास्त संख्येंत पुरुष काम करीत होते. 1911 पर्यंत त्यांच्या कल्याणा साठी कोणत्याही प्रकारचे कायदे केले नाही. 1911 कारखाण्याच्या कायद्या प्रकारे

- पुरुष कार्मिक दररोज 12 तासापेक्षा जास्त काम करु नये.
- सहा तास कामानंतर अर्ध्यातास विराम करण्यासाठी ठेवावा.

भारत आणि पाकिस्तान ला स्वंतत्र करण्याचे निर्णय ब्रिटीशांनी घेतले

1850, 1860, 1870, 1880, 1890, 1900, 1910, 1920, 1930, 1940, 1950, 1960, 1970, 1980, 1990, 2000, 2010, 2020, 2030

- तुम्ही कोणत्या वर्षी जन्मलात? या वेळेपत्रकात त्याला दर्शवा? तुमचे आई वडील, आजोबा, आजी कांही वृध्द नातेवाईकाच्या जन्मलेला वर्ष दर्शवा?
- यांच्या मध्ये कोणीतरी कोणत्याही कार्मिक कायद्याव्दारे फायदा घेतलात का? माहित करुन घ्या?

- पहिल्यांदा कामगारांच्या कल्याणा बाबत भारत देशातील सुशिक्षित लोकांनी त्या कडे लक्ष का दिले नाही?
- कामगार कायदे उद्योगपतींना कशा प्रकारे प्रभावित करु शकले?
- ब्रिटीश उद्योगपतींनी भारत देशात औद्योगिक विकासाचा विरोध केला. तरीपण ते भारत देशातील काम-गांराच्या बाजुने उभे राहिले? का?
- सध्याच्या कायद्यानुसार किती वयाच्या आतील मुलास कामगार म्हणुन कामावर ठेऊ नये?
- ब्रिटीशांच्या काळात किती वयाच्या आतील मुलांस कामगार म्हणुन ठेऊ नये असे केले?
- कामगार कायद्यान्वये मुलांस महिला पुरुषांस किती तास काम करावे?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



चित्र. 16.9: 1931 मध्ये इंग्लंडमधील लँकशायर गावामधील मील कामगार गांधीजींशी भेटून आनंदी झाले आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळी प्रति समर्थन दर्शविले.

भारतीय कामगारांप्रति ब्रिटीश कारखानदांराची सहानुभुती ही चांगली बाब असली तरी भारतीय कारखांणदारांनी मात्र त्यावर शंका उत्पन्न केली. वास्तविक पाहता. ब्रिटीशांना भारतीय कामगारांची आवस्था सुधारावी ही इच्छा होती.

भारतीय कामगारांसाठी कल्याणाच्या योजना आणि त्यासाठी चे कायदे केले तर इकडचे उद्योगधंदे वाढणार नाही असे विचारवंताचे ठाम मत होते. 1875 साली बंगाल मधील एका वृत्त पत्रात या संबंधी काही वाक्य छापुन आली ती अतिशय उद्बवदक होती. "या पध्दतीने जर कामगारांच्या कल्याणाच्या योजना आमलांत आल्या तर संपुर्ण कारखाणदारी धोक्यात येईल आणि त्यामुळे आणि कामगार मृत्युच्या खाईत लोटले जातील. आपली कारखानदारी चांगली, मजबुत, सक्षम झाल्यानंतरच कामगार कल्याणाचे कायदे करण्यात यावे."

कारखानदार आणि विचारवंताच्या या भितीला कशाचाच आधार नाही. भारतातील कारखाने आणि उद्योगधंदे भरपुर नफा कमऊ लागले. दिवसेंदिवस नवनविन कारखाने स्थापित होऊ लागले. उद्योगधंद्यांची भरभराट कामगारांच्या हाती असल्यामुळे कामगारांचे कल्याण कामगारच पाहु लागले. यात गैर काय?

## कामगार संघटना

काळानुसार कामगरांच्या समस्या सर्वांना माहित होऊ लागल्या. कांही शिकलेले लोक कामगारांच्ये पक्षाचे उभे राहायला लागले. कामगरांच्या समस्या माहित करीत वर्तमाना पत्रात लेख लिहायला लागले. कामगारांच्या कल्याणासाठी लहान लहान संस्था निर्माण व्हायला लागल्या.

संपाच्या वेळेस कामगार काही सुशिक्षीत लोकांच्या सहाय्याने त्यांच्या स्वताच्या संघटना निर्माण करुन घेतल्या, त्याला कार्मिक संघटना म्हणतात. या संप करायला मिलमालकांसोबत करार करायला. हळु हळु या संघटना संप काळातच नाही तर कामगारांच्या कल्याणासाठी हक्कासाठी वर्षानुवर्षे काम करत राहत होत्या. अशा संघटना 1920 पासुन निर्माण झाल्या. सोशिलीस्ट, विचारांनी प्रभावित झालेले लोक यांच्या सोबत जास्त राहायचे अशा संघटनेत गिरणी कामगार संघटना एक होय. 1928 मध्ये मुंबईतील कामगार संपावर गेले होते. अहमदाबाद मध्ये गांधीजींच्या नेतृत्वाखाली मजदूर महाजन नावाच्या एका कार्मिक संघाच्या निर्मीतीमुळे सरकार, मिलमालक गोंधळात पडले. त्यामुळे संपावर मर्यादा लावत. कायदे तयार करायला लागले. कामगारांच्या कल्याणासाठी सरकारने कार्मिक अधिकारांची कामगारांच्या समस्येचे निराकरण करुन घ्यावे असा सरकार दबाव आणायला लागली.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

परंतु कामगांरानी याचा स्विकार केला नाही. त्यांच्या फायद्यांच्या सुरक्षितेसाठी त्यांची स्वत:ची संघटना निर्माण करुन घेणे योग्य आहे असे समजते. अशा प्रकारे संघटना निर्माण करण्याचा हक्क आणि संपावर जाण्याचा हक्क या समस्येवर कामगार एकीकडे आणि सरकार मिलमालक दुसरी कडे होऊन आंदोलन चालुच आहे.

- ब्रिटीश काळात भारतात निर्माण झालेल्या दोन मुख्य कार्मिक संघटना कोणत्या?
- कामगारांना कार्मिक संघ का महत्वाची आहे? यावर चर्चा करा?

## महत्वाचे शब्द

| | | |
|---|---|---|
| 1. आरक्षित जंगले | 2. संरक्षित वने | 3. लिलाव |
| 4. सामाजिक कार्यकता | 5. उद्योगपती | 6. मारवाडी व्यापार |
| 7. संप | 8. कामगार संघटना | 9. औद्योगिक शहरे |
| 10. कामगारांची वसती | | |

## आपल्या अभ्यासात सुधारणा करा

1. ब्रिटीश शासनाच्या आधी लोक जंगलाचा कसा उपयोग करत होती? त्या दिवसात जंगले वने संपुर्ण नाश होण्याची संधी तेवढी का नव्हती? (AS1)
2. आदिवासी लोकांनी कोणाच्या विरुध्द उठाव केला? त्यांचा रोग व निषेध त्यांनी कसा व्यक्त गेला? काही उदाहरणे द्या? (AS1)
3. आदिवासी उठाव ब्रिटीश शासकांनी कशा प्रकारे दडपुन टाकले? (AS1)
4. भारत देशातील विविध भागात आदिवासी बंड उठाव दर्शविणारी काळ मोजपट्टी तयार करा? (AS3)
5. आदिवासीचे आंदोलन उठाव कुठे कुठे झाले ते सांगुन त्या प्रदेशांना भारत देशाच्या नकाशात दर्शवा. (AS5)
6. ब्रिटीश शासन काळात भारतीय उद्योगपतीना कोणत्या अडचणी येत होत्या? (AS1)
7. ब्रिटीश शासन काळात उद्योग स्थापन करणे भारतीय कंपणी पेक्ष यूरोपियन कंपनीनाच का जास्त प्राधान्य व संधी दिली जात होती? काही कारणे सांगा? (AS1)
8. कामगाराचे कायदे प्रथम मुलांना त्या नंतर महिलांना शेवटी पुरुषांसाठी केले त्याला या क्रमाणे का केले? (AS1)
9. औद्योगिक विकासास शिक्षण कसे प्रभावित करते? वर्गात चर्चा करा? (AS6)
10. 20 व्या शतकातील प्रमुख औद्योगिक शहरे भारत देशातील नकाशात दाखवा? (AS5)
11. पान क्र. 214 वरील *आदिवासींचा उठाव* हा परिच्छेद वाचुन त्याचे विवेचन करा? (AS2)

## प्रकल्प कार्य

1. वनविभागात जाऊन वनाच्या संरक्षण करणाऱ्या स्थानिक लोकांचे उद्योगाविषयी कोणती काळजी घेऊन त्यांचा उपयोग करु शकतात? तेथील अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष चर्चा करा?
2. तुमच्या जवळील असणाऱ्या औद्योगिक कारखाण्याना भेट देऊन त्यांची माहिती तांत्रिक विज्ञानातील बदल, कामगार, कोठुन येतात माहित करुन घ्या. काही कामगारांच्या मालकांच्या प्रतिनिधीशी बोलुन त्याचे मनोगत समजुन घ्या.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

धडा 17

# लोकशाहीचा विस्तार

अगोदरच्या धड्यामध्ये तुम्ही लोकसत्ताक क्रांती विषयी वाचलेले आहेत. ज्यामुळे युरोपमध्ये लोकशाही युक्त सरकारची स्थापना झाली. लोकशाही सरकारची स्थापना जे लोकांच्या इच्छा आणि गरजा यानुसार काम करीत असते. ज्यामध्ये सर्व लोक मोकळ्या मनाने व संपुर्णपणे भाग घेण्यास सक्षम असतात. ज्यामध्ये सर्व प्रकारच्या लोकांना आर्दशत्मक जागा मिळते. हे सर्वच स्वप्न असते आणि त्यासाठी अजुनही जगात सर्वत्र लोकांचा प्रयत्न चालु आहे.

चला दोन देशाचे उदाहरण पाहु या. जिथे लोकांनी लोकशाहीचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी नुकतेच लढा दिलेला आहे. हे देश लिबीया आणि म्यानमार आहेत.

- जगाच्या नकाशामध्ये लिबीया आणि म्यानमारचे स्थान दाखवा. कोणत्या खंडामध्ये ते दोन देश येतात?



चित्र. 17.1: लोकाचा प्रतिकार

**लिबिया Libya**

लिबीया उत्तर आफ्रिकेचा गरीब देश होता. त्या देशाची नव्याने वसाहत इटलीकडुन करण्यात आलेली होती. आणि 1951 मध्ये बऱ्याच धडपडी नंतर हा देश स्वतंत्र झाला. जेव्हा हा देश स्वतंत्र बनला इटलीने सत्ता राजा इद्रीसच्या हवाली केले. त्यांनी काही श्रीमंत व शक्तीशाली कुटुंबीयाच्या मदतीने देशावर राज्य केले.

येथील लोक मुख्यता: वेगवेगळ्या आदिवासी संवर्गाशी संबंधीत आहेत. ते वाळवंटात शेतीवर व प्राण्यांच्या कळपावर आधारीत आहेत. या आदिवासी वर्गावर पारंपारीक वर्गाचा मुख्य कुटुंबीयाचे वर्चस्व स्थापित केले. 1959 मध्ये लिबीयामध्ये खुप मोठ्या प्रमाणात पेट्रोलियचे साठे सापडले. आणि तेलाच्या विक्रीपासुन देशामध्ये भरपुर पैसा आला. राजा आणि काही ताकदवार कुटुंबियांनी या नविन संपत्तीवर त्यांचे नियंत्रण ठेवले. सर्व संपत्ती आपल्या ताब्यात घेतली. याच वेळेच्या आसपास उत्तरीय आफिक्रेमध्ये राष्ट्रवादी भावनाची लाट उसळली. तरुण लोकांना आधुनिक राज्याची स्थापना करावी वाटली. जे वसाहतीवादी ताकतीच्या नियंत्रणाखाली काम करीत नव्हते व ते त्यांनी लोकांच्या कल्यानासाठी काम केले. त्यांना देशाची सुधारणा करावी असेही वाटले. स्त्रींयाचा छळ, जुलुम संपवावा व समाजाच्या काही वर्गामध्ये सततचे युध्द थांबवावे व एकता आणि शांततेची स्थापना करावी असे त्यांना वाटले. त्यांना खात्री करायची होती की, तेल विक्री पासुन झालेली



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

नविन संपत्ती सर्वांना समानपणे वाटली जावी. लिबियामधील भरपुर लोकांना या युक्तीने प्रेरीत झाले.

1969 वर्षामध्ये मुम्मार गडाफी आणि 70 तरुण लष्करी अधिकाऱ्यांच्या साहाय्याने लिबीयाच्या राज्यावर आले नियंत्रण मिळविले. अधिकार ग्रहण केले. या अधिकाऱ्याचा गट त्यांच्या स्वताला मुक्त अधिकाऱ्यांची चळवळ असे म्हणु लागले. राजा इद्रिस देशातुन पळुन गेला राज्यशाहीचा अंत झाला. राष्ट्राला समानसत्तावादी लिबियन अरब लोकसत्ता राज्य म्हणुन घोषीत करण्यात आले. लष्करी फौजेने पुर्णपणे या अधिकारण ग्रहण करण्यात पाठींबा दिला. ही चळवळ क्रांतीकारी राज्य चालवणारे मंत्रीपरिषद Revolutionary Command Council (RCC) यांच्या नेतृत्वाखाली होती. यामध्यें लष्करी दलातले 12 सदस्य होते. या नविन नेतृत्वास लिबीयाचा विकास एक आधुनिक समतावादी राष्ट्र म्हणुन करायचा होता. त्याच बरोबर इस्लामच्या मुलभुत तत्वांचा स्विकार करायचा होता. जे तेथील अधिक लोकांचा धर्म होता.

- लोकशाही पध्दत स्थापना करण्याकरीता या लोकांच्या समोर कोणत्या समस्या उभे राहतात असे तुम्हाला वाटते?

जसे आपण वर पाहिले लिबीयन समाज मुळता: आदिवासी होते. आणि त्याचे नेतृत्व आदिवासी कुटुंबियांच्या मुख्य माणसाकडुन केले गेले. येथील लोक त्यांच्या स्वता:च्या आदिवासी गटाशी आणि त्यांच्या सन्मान व हक्क इत्यादीपुरतेच संबंध ठेवत होते. त्यांना इतर सर्व लोकांच्या कल्याण करण्याशी काहीही घेणे देणे नव्हते. जास्तीत जासत लोक गरीब व भटकणारे गुरखी होते, ते अशिक्षीत होते. स्त्रियांचे जिवन बुरख्यापुरतेच मर्यादीत होते. त्यांना सामाजिक कार्यक्रमात भाग घेण्याची परवानगी नव्हती. नविन कारकिर्दीत अनेक सुधारणा घडुन आल्या त्यामुळे लिबीयाची फार लवकर वाढ झाली. उदा. तेलाच्या ससाधनाचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. एक कार्यक्रम ज्यामध्ये भटकेपणा थांबवण्याकरीता गरीब लोकांना ओलीत जमीन देऊन शेतीची मशागत करण्यास लावणे. सर्वांना मोफत शिक्षण यामध्ये स्त्रियांचा देखील समावेश आहे. सर्वांना मोफत वैद्यकिय सेवा तेलांच्या विक्रीपासुन मिळालेल्या नफ्याचे सर्व नागरीकामध्ये समान वाटप सर्वांना मोठ्या प्रमाणात सुट दिलेल्या घरबांधकामाच्या योजनेचा विकास इत्यादी सामान्य जिवन जगण्याची अपेक्षा 50 वर्षापासुन ते 77 वर्षापर्यंत इतकी वाढली. खुप मोठी सुधारणा घडुन आली ती म्हणजे स्त्रियांना स्वातंत्र व समान दर्जा मिळत आहे की, नाही याची खात्री करु घेणे. स्त्रीयांना संपत्ती गोळा करण्याचा व्यापार करण्याचा व सरकारी नौकरी करण्याचा अधिकार नव्हता. स्त्रीयांचे व पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण 90% पेक्षा जासत आहे. या सर्वांचा परिणाम म्हणुन पुर्ण आफ्रिकेमध्ये लिबीया सामाजिक कल्याणाचा उच्च स्थर प्राप्त करण्यास यशस्वी झाला.

सर्व लोकांचा लोकसत्ताक पध्दतीने समावेश करणे जसे आदिवासीय लोकांचा भटक्या जातीचा अशिक्षीत लोकांचा स्त्रीयांवर असणारे बंधन इत्यादी गोष्टी कठिण होत्या नविन लिबीयन नेतृत्व यांनी नविन लिबीयन नेतृत्वानी सामान्य लोकांना सार्वजनिक घडामोडींमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहीत करण्याचे प्रयत्न केले. तसेच केंद्रामध्ये लोकांचे मंत्रिमंडळ आणि निवडलेल्या लोकांची विधानसभा निर्माण करण्यात आल्या. जसे समाज अतिगतीने बदलत गेला. विकासामुळे खरी सुशिक्षीत मध्यम लोकांचा वर्ग उदयास आला आणि या मंत्रीमंडळामध्ये भाग घेण्यास सुरुवात केली. असे असतांनाही गडाफीचे सरकार या लोकतांत्रिक पध्दतीवर विश्वास ठेवण्यास तयार नव्हता. त्याऐवजी त्याने क्रांतीकारी मंत्रीपरिषद यांचे समांतर पध्दतीने चालणारी व्यवस्थेचे नेतृत्व निर्माण केले. त्यांचे नेमणुक आणि नियंत्रण गदाफी



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

आणि RCC. यांच्याकडुन करण्यात आले. लोकतांत्रिक सभेला या न निवडलेल्या नेत्यांनी घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी करावी लागत होती. त्यांच्या परिणामाने लोकांची आवड या सभेवर राहिली नाही. पण सरकारने त्यांच्या समावेश करण्यावर दबाव आणण्याचे प्रयत्न चालु ठेवले. RCC सुध्दा टिका आणि विरोध सहन करीत नव्हता. त्याने निष्ठुर अशा लष्करी सैन्याच्या शक्तीचा उपयोग अटक करण्यास, साक्ष देण्यास व आपल्या राजकीय प्रतिस्पर्धी खतम करण्यासाठी केला. तिथे वर्तमानपत्रास स्वातंत्र्य नव्हते आणि स्वतंत्र संघटना जसे व्यापार संघटना किंवा इतर सभा इत्यांदीना परवानगी नव्हती. कोणत्याही राजकीय पक्षांना लिबीयामध्ये काम करण्यास परवानगी नव्हती.

अशा हुकमशाही कार्यवाहीने काही ताकदवर कुटुंबियांना त्यांची स्थिती मजबुत करण्यास मदत केली. त्याचे सरकारवर आणि आरसीसी आणि सरकारच्या मालकीच्या तेलकंपण्यावर नियंत्रण केले. लोकाकडुन त्यांच्या तिरस्कार करण्यात आला. त्यांच्या शक्तीचा त्याच्या कडुन दुरुपयोग केल्यामुळे परंत लोकाडुन त्यांच्या असंतृस्षटता व्यक्त करण्याकरीता मार्ग नव्हता.

जलद विकास, शहरीकरण, नविन आर्थिक संधीचा उदय आणि नोकऱ्या याचा अर्थ आदिवासी जिवनपध्दती हळुहळुने खतम झाली व वेगवेगळ्या आदिवासी जामातीचे लोक एकत्र राहु लागले. आणि शहरामध्ये ते मिसळुन गेले. तेलांचे संपादने व्यापर व उद्योग इत्यादी सरकारच्या नियत्रंणात आले. त्यामुळे सरकारी क्षेत्रामध्ये भरपुर नविन नोकऱ्या उपलब्ध झाल्या. लिबियामध्ये नविन मध्म वर्ग उदयास आला. जे व्यापार व उद्योगधंदे करण्यासाठी तयार होते. परंतु सरकारच्या योजनामुळे व काही शक्तीशाली कुटुंबियामुळे या लोकांना व्यापारात प्रगती करणे कठिण झाले.



*चित्र. 17.2: इजिप्तमधील रस्त्यावरील एक चित्र. ह्या दशकाच्या दरम्यान दुसऱ्या देशात लोकशाही चळवळ सुरु झाली.*

संपुर्ण अरब जगामध्ये 2010 च्या शतकात लोकशाही शासन स्थापित करण्याकरीता आंदोलन सुरु होते. त्याची सुरुवात एका लहान देश ट्युनिशिया पासुन झाली आणि त्याचा प्रचार इजिप्त, लिबीया, येमेन, बाहेरान, झीरीया व इतर देशामध्ये झाला. ही क्रांतीकारी प्रदर्शनाची प्रतिकाराची आणि युध्दाची लाट अरब जगात पसरली आणि त्याची नेमकी सुवात 15 डिसेंबर 20य10 ला झाली. ही घटना अरबचा वारस 'Arab Spring' म्हणुन प्रसिध्द झाली.

### लिबियातील बदल Change in Libya

जानेवारी 2011 च्या सुरुवातीस काही लोकांचा समुदासय यांनी घराच्या बांधकामात उशीर झाल्याने आणि देशाच्या उत्तरपुर्व भागामध्ये शहरात राजकीय भ्रष्टाचार झाल्याने प्रतिकार करण्यास सुरुवात केली. त्याची सुरुवात गल्लीतील शांती झाली. पोलीसांनी या शांती यात्रेस दाबुन टाकण्यास प्रयत्न केला. हे प्रतिकार दुसऱ्या शहरात पण पसरली. बेन्याझी नंतर हे शहर मोठ्या तिवृ प्रतिकाराचे केंद्र बनले. याठिकाणी नागरी सभ्यता तिरस्करणी होती. येथील जास्तीत जास्त नागरीक बेरोजगार होते व अने कुटुंबाचे उत्पन्न स्थिर नव्हते. देशातील लोक इंटरनेट आणि मोबाईल फोन व्दारे आपले दुख सांगु लागले. तसे असतांनाही सरकार च्या ताब्यात असलेले प्रसार माध्यमे लोकांच्या समस्या लोकाच्या



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

समोर आणण्यास नाकारले. फ्रेबुवारी पर्यंत आंदोलनाने तिवृ स्वरुप धारण केले. बेन्माझी शहरामध्ये लोक पोलिसांच्या विरोधात गेले. गोळीबार करण्यात आली व लोक जख्मी झाले. काही लोकांनी आपल्या हातात शस्त्र घेण्यास सुरुवात केली. या बंडामध्ये सैनिकांनी भाग घेतला. ज्यांनी आपल्या सरकारी सैन्यातील नौकऱ्या सोडुन दिलेल्या होत्या. पण अधिक संख्येने भाग घेणारे सामान्य लोक होते. जसे वकील, कामगार, अभियंत्रीक, शिक्षक, विद्यार्थी इत्यादी राजकीय संयुक्तीक गट यानी गडाफी सरकाच्या विरोध केला. व आंदोलनाकधारी लोकांबरोबर येऊन मिसळले. सुरक्षा दलाचे जवानांनी गोळीबारी सुरु केली. प्रदर्शनकाऱ्यांनी सरकारी इमारतीवर हल्ला केला. त्यांनी स्थानिक रेडीओ केंद्रावर ताबा मिळवला. लोकांनी वेगवेगळ्या मागण्या केल्या जसे प्रस्तुत घटना बदलणे, विविध राजकीय पक्षांचे असलेली लोकशाहीची स्थापना करणे, गडाफी सरकारने देखील त्यांच्या पाठींबा देणाऱ्यांना एकत्रित करण्याचा प्रयत्न केला व स्वता:स पाठींबा मिळविण्याकरीता प्रदर्शन केली. कही दिवसांनी नागरी युध्द सुरु झाले. साधारण लोकानी स्वत: शस्त्र घेतली. त्याचवेळी काही सैन्यातील सदस्यांना जाऊन मिळाले. गडाफीने आपल्या सैनिक दलांचा वायु सेनेचा लोकांच्या विरोधात त्यांचे बंड मोडुन काढण्यासाठी उपयोग केला. बरेच लोक मारले गेले. अनेक शक्तीशाली राष्ट्र जसे अमेरीका हस्तक्षेप करुन गडाफीचे सरकार खतम करण्याचे व लोकांच्या हितासाठी काम करायचे या सरकारची स्थापना करण्याकरीता तयार होते. याचे कारण लिबियामध्ये असणाऱ्या तेल संपदावर नियंत्रण मिळवण्याचा उद्देश किंवा इच्छा या देशांनी बंड करण्याऱ्या गटांना पाठिंबा दिला. लिबीयांला नागरी युध्दा करण्यास भाग पाडले. संयुक्त राष्ट्र संघानी हस्तक्षेप करुन लिबीयांच्या आकाशमार्ग बंद केला. ज्यामुळे सरकार वायुसेनेचा उपयोग करुन बंड करण्यावर बॉम्ब चा उपयोग करणार नाहीत. तसे असुनही सरकारने आकाशमार्ग हल्ला चालु ठेवला. तेव्हा फ्रांन्स, अमेरीका, इग्लंड इत्यादी देशांनी आपल्या वायुसेनेचा उपयोग लिंबीयान सरकारच्या विरोधात बाम्ब टाकण्यासाठी केला. आखेरीस क्रांतीकाऱ्यांचा विजय झाला व गदाफी मारला गेला.

*गृह युद्ध : देशातील विविध लोकात, पक्षात किंवा प्रांतामध्ये होणारे युद्ध*

नविन सरकारची स्थापना करण्यात आली आणि 14 नोव्हेंबर 2012 ला शपथ घेण्यात आली. मुक्त व स्पष्ट निवडणुक झाले. ज्यात 100 राजकीय पक्षांनी भाग घेतला. व 200 प्रतिनिधि निवडण्यात आले. तात्पुरती राज्यघटना बनविण्यात आली. अलीकडच्या काळाच लिबियामध्ये लोकशाही सरकार स्थापन होण्याची शक्यता आणि आशा आहे. अंर्तराष्ट्रीय समाजाचे लक्ष लिबियाकडे आहे की, लोकशाही आली तर, ती टिकेल आणि मजबूत होईल का ?

- गदाफी सरकारकडुन लोकांचा भरपुर फायदा झालेला होता. तरीसुध्दा तुम्हाला असे वाटते का लोकांनी त्यांच्या विरोधात बंड पुकारले ?
- गदाफी सरकारने घोषणा केली, त्यांचे सरकार लोकशाही प्रधान सरकार आहे. तरीसुध्दा खरोखरच्या लोकशाहीचे कोणते गुणविशेष गदाफी शासनव्यवस्थेत नव्हते. आणि कोणते होते ?
- लोकशाहीसाठी नागरी स्वातंत्र्य महत्वाचे आहे ? लिबिया या देशाचे अनुभव घेऊन वरील विषयी चर्चा करा ?
- हुकुमशाही वृत्तमान पत्रे, प्रसारमाध्यमे, टि.वी. इत्यादीवर नियत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतात. लोकांमध्ये माहिती विचारांची देवान घेवान करण्याकरीता इतर मार्ग तुम्हाला माहिती आहे का ?
- तुनिसीयन लडा एका व्यापाऱ्याचा मृत्युने सुरु झाला. फेसबुकच्या उपयोगामुळे आंदोलनांची ताकद वाढली. या सारख्या नेटवर्क साईटवर सरकारला नियंत्रण मिळवणे इतके सहज नाही असे तुम्हाला वाटते का ?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## म्यानमार (बर्मा) Myanmar (Burma)

जगाच्या नकाशात बर्मा (आधुनिक नाव म्यानमार) चे ठिकाण दाखवा. भारताच्या सिमेस हा देश येतो. बर्मा भारताप्रमाणेच इंग्रजाकडुन शासित देश आहे. हा देश मोठ्या प्रमाणात सागवान, खाद्यअन्न जसे तांदुळ, आणि धातु जसे टिनांची पत्रे, व मुल्यवान खडा जसे मानिक लाल व इंद्रनिल इत्यादींचा पुरवठा करणारा देश आहे. भारतदेश स्वातंत्र्य झाल्यावर पाच महिण्यानी बर्मा देश ही स्वातंत्र झाला. त्यांनी आपल्या सारख्याच संसदेची स्थापना केली. 1951, 1956 आणि 1960 मध्ये निवडणूका झाल्या ज्यामध्ये विविध राजकिय पक्षांनी भाग घेतला, त्यावेळेस असे वाटत होते की, बर्मा देश भारत देशाप्रमाणे लोकशाही राज्य म्हणून उदयास येईल. पण त्यावेळी बर्मा देशात एकजूट राष्ट्रीय पक्ष जो नेतृत्व करु शकेल असा नव्हता.

तुम्ही आठवण करु शकता, 1947 मध्ये भारतात मोठ्या संख्येने वैभवशाली राजे होते, जसे हैद्राबाद प्रांत आणि त्यांना गणराज्यामध्ये मिसळण्यास काही वर्ष लागले. त्याचप्रमाणे बर्मात देखील भरपुर छोटे, भिन्न जाती, भाषा बोलणारे राज्य होती.

1947 मध्ये आंग सन बर्माच्या भिन्न जाती समुदायाचा नेता त्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवुन दिले होते. त्यांनी अनेक अल्पसंख्यक, भिन्न जातीच्या नेत्यांनी चर्चा करुन एक करार करण्याचा प्रयत्न केला. त्याकरारामुळे विभीन्न जातीच्या लोकांना हक्क मिळतील. मनाचा निर्धार करता येईल व अल्पसंख्याक लोकांना लोकशाही प्रक्रियेमध्ये समाविष्ठ होण्याची खात्री मिळेल. अशा स्थितीत आंग सन ची हत्या करण्यात आली. बर्माच्या लष्करी सेनेने विभिन्न जातीच्या प्रातांमध्ये जबरदस्तीने राज्य करण्यास सुरु केले. बऱ्याच विभिन्न जातीच्या समुदायांनी शस्त्र उचलले त्यांच्या प्रांतीतील लोकांचे बर्माच्या जुल्मी राजापासुन संरक्षण करण्यासाठी त्यांची मागणी होती. राजकीय स्वतंत्र सर्व समुदायाचे हक्क व लोकशाही प्रक्रियेचा समावेश जसे 1962 मध्ये विभिन्न जातीसमुदायांची भांडणे फारच तिवृ झाली. व त्यांच्याकडुन निवडुन दिलेले सरकार बरखास्त करण्यात आले. थलसेनेचा मुख्य ने विन ने सरकारची कमान संभाळली. त्यांने सर्व कारखाण्याचे व खनिज संपादनाचे राष्ट्रीयकरण करण्याचा प्रयत्न केला. मुक्त आरोग्य सेवा, शैक्षणिक व्यवस्थेची स्थापना करण्यात आली. 1962 ते 1965 च्या मध्ये जमीनदारांच्या व पैसे जास्त व्याजाने देणाऱ्या सावकरांच्या विरोधात महत्वाची कायदे स्विकारण्यात आली. त्यांचा उद्देश शेतकऱ्यांच्या जमिनी व संपत्ती व तहसिलने जमिनी देण्याबद्दल च्या हक्काचे संरक्षण करणे होते. यामध्ये तहसीलने दुसऱ्यांना जमीन देणे बंद करण्यात आले. हे लहान गरीब शेतकऱ्यांना मदत करण्याकरीता असा कायदा बनविण्यात आला.

*स्वायतत्ता : एकाद्या देशाला, प्रांताला, संघटनेला स्वत:च राज्य करण्याचे स्वातंत्य देणे*

थलसेनेचा मुख्य तेव्हापासुन देशावर राज्य करत असलेला आहे. शासन चालकांनी



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

स्पष्ट केले की, ते सामाजिक धोरणाचा अवलंब करत होते. व सर्व कारखाणे उद्योगधंदे व खाणीचे राष्ट्रीयकरण केले. यामुळे देशाची खुप मोठी संपत्ती संसादने थलसेनेच्या अध्यक्षांकडे गेली. लिबियांमध्ये सैनिक दलांनी राष्ट्रीविकासाचे समाजकल्याचे कार्य केले. त्यांच्या विरोधात बर्मामध्ये तसा विकास झाला नाही. व बर्मा दुर्बळ राष्ट्र बनला. जिथे शेतकऱ्यांवर त्यांची मुले सैनिकास विकण्यास भाग पाडले. व त्यांना खानीमध्ये काम करण्यात भाग पाडले. मोठ्या प्रमाणात कामगार म्हणुन काम करण्यास भाग पडले. त्याच्यामध्ये मुलांचाही समावेश होता.



*आंग सन सू की: लोकशाहीला साथ देणारे म्यांमारचे भींती पत्रक*

विद्यार्थ्यांनी नेहमीच लष्करी शासनाच्या विरोधात प्रदर्शन करण्यात पुढाकार घेतला. पण अशा प्रदर्शनास सैनिकाकाडुन दाबुन टाकण्यात आले. 1988 मध्यें सैनिकदलाच्या विरोधात खुप मोठी प्रदर्शन केली. क्रुरपणे या प्रदर्शनाकऱ्यावर अत्याचार करण्यात आले. व हजारो प्रदर्शनकारी मारण्यात आले. नविन सैन्यदलाची सभा त्यांनी राज्यावर आपला अधिकार गृहन केला व निवडणुक करण्याचे आश्वासन दिले. याचवेळी आउंग सन सु की (सु ची) बर्मामध्ये लोकशाही स्थापना करण्याकरीता जे प्रदर्शन लढा दिला जात होता त्या लढ्यातील तो महत्वाचा केंद्र बिंदु बनला.

राजकर्तानी 1990 मध्ये निवडणुकांची घोषणा केली. या निवडणुकामध्यें नविन राजकीय पक्ष लोकशाही करीता संघटीत National League for Democracy (NLD) सु की, च्या नेतृत्वाखाली बहुसंख्य जागा (80%) जिंकल्या. त्यावेळी सु ची तुरुंगात होता. लष्करी सत्तेने सु ची ला तुरुगांतुन सोडण्यास व सत्ता सोपवण्यास नकारले. तिला आपल्या घरामध्ये नजरकैद करण्यात आले. तिला स्वत:च्याच घरात कैद्याप्रमाणे रहावे लागले. तिला बाहेर जाण्यास व लोकांशी संपर्क करण्यास परवानगी नव्हती. तिला (सु की) जेव्हा तिचा पती कॅन्सरने मरण पावला तेव्हा त्यांच्या अंतीम यात्रेस ती जाऊ शकत नव्हती. आपल्या दोन मुलांना भेटने देखील तिला अशक्य झाले.

जगातुन सर्वत्र लष्करीशासन संपावुन लोकशाही सरकारची स्थापना व नागरी स्वातंत्र्य बहाल करण्याकरीता तेथील अराजक लष्करी सत्तेवर दबाव टाकण्यात आला. आंतरराष्ट्रीय दाबाव टाकण्यात आला व आर्थिक संबंध थांबवण्यात येईल अशी सुचना दिली. यामुळे बर्माला त्या देशाबरोबर व्यापार करण्यास परवानगी नव्हती. त्याचा परिणाम म्हणुन बर्माला आपल्या उत्पादीत आयात करणे आश्यक झाले. याचा तेथील अर्थव्यवस्थेवर खुप मोठा प्रभाव पडला. तरी सुध्दा यामुळे देशातील साधारण लोकावर याचा त्रास झाला.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## बर्मा देशातील बदल Change in Burma

2008 पासुन बर्मा या देशात वेगवेगळ्या स्वरुपाचे बद्दल घडवुन येत आहेत. जसे लोकशाहीची स्थापना करण्या करीता निवडणुका घेऊन लोकमताव्दारे बहुमत मिळवणे. गणतंत्र लोकशाहीला मिळते जुळते असे नाव ठेवणे इत्यादी. तसे असतांनाही काही प्रमाणात निवडणुकाव्दारे निवडलेल्या उमेदवाराच्या मदतीने सरकार चालवण्यात आले. संयुक्त राष्ट्र संघाच्या निरिक्षणाखाली 2010 मध्ये निवडणुका झाल्या.

सु की ला निवडणुकीमध्ये भाग घेऊ दिला नाही. निवडणुका झाल्यावर तिला तिच्या घरातुन मुक्त करण्यात आले. तिच्या पक्षाने या निवडणुकीमध्ये भाग घेण्याचे नाकारले. त्याचा परिणाम लष्करी सैन्याने त्यांच्या हिताची पक्षानी भरपुर जागा जिंकल्या निवडणुकी मध्ये काही अवैद्य जुना प्रकार घडण्याचा आरोप आहे. लष्करी शासन बर्खास्त केले. आणि थाई सेन देशाचा अध्यक्ष बनला.

- म्यांमारमध्ये लोकशाही टिकून राहिल असे तुम्हाला वाटते का?
- लिबीयामध्ये स्वातंत्र्यानंतर लोकशाही का स्थापित झाली नाही? तुम्हाला असे का वाटते?
- लिबिया आणि बर्मा मध्ये लोकशाही शासनप्रणाली बहाल करण्यामध्ये विद्यार्थ्यांनी व तरुणांनी खुप महत्वाची भुमिका कशी निभावली?
- लिबीया व बर्मा देशाच्या घटनाचे वर्णन करत असतांना दोन्ही देशातील कोणत्या समान घटना तुम्हाला पाहण्यास येतात?

  ह्या गोष्टी लक्षात घेऊन उत्तरे द्या - नेतृत्व, संर्घषाचे स्वरुप, बदलची प्रतिक्रिया
- लिबिया आणि बर्मामधील राजकिय पक्ष आणि मतदान ह्या दोघांशी संबंधित वाक्यांना अधोरेखीत करा?
- बर्मा आणि लिबियाच 2011 मध्ये झालेल्या बदलाबद्दल, तुम्ही जे ऐकले आहे, ते लिहा?

## लोकशाही आणि हुकुमशाहीची काही वैशिष्टये Some features of democracy and dictatorship

नुकत्याच झालेल्या लोकशाहीच्या दोन लढ्याबद्दल तुम्ही वाचलेले आहे. जरी दोन देश वेगळे असले तरी तेथील लोकांना अशा सरकारी स्थापना करायची होती. ज्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात समानता होती.

गदाफी आणि आरसीसी ने प्रांतातील लोकांच्या कल्याणाची कामे केली ज्यामध्ये सर्व लोकांच्या मुलभुत गरजा पुर्ण केल्या गेल्या व सर्व लोकांकडे शिक्षण व नौकऱ्याव्दारे त्यांचे जिवन सुधारण्याची संधी होती. त्याचप्रमाणे बर्मीयन जुन्टाने कल्याणकारी योजनाचे आकलन केले व जमिनीची सुधारणा केली पण त्याचे लक्ष फक्त लष्करी दलाचे नियत्रण करणे होते. लष्करी सैन्याने संसादनाची व देशातच्या लोकांची पिळवणुक केली. लोक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

खुपच दारिद्री गरीब बनले. तसे तर दोन्ही देशावर लोकांचे राज्य होते. दोन्ही राज्याची लष्करी सैन्याचा मुख्य आधार घेतला. त्यांनी मुक्तपणे निवडणुका होऊ दिल्या नाहीत. किंवा राजकीय पक्षांना काम करु दिले नाही. त्या दोघांनी निवडलेल्या प्रतिनिधीला सरकारची स्थापना करण्यास परवानगी दिली नाही. त्यांनी सरकारच्या विरोधात विचार व्यक्त करायचे स्वतंत्र किंवा संघटना निर्माण करण्याचे स्वातंत्र्य किंवा प्रदर्शन करण्याचे स्वातंत्र्य दिले नाही.

दोन्ही देशात लोकांना असे सरकार पाहिजे होते ज्यांना साफ व सरळ निवडणुकीच्या प्रक्रीयेने लोकांनी निवडुन दिलेले असावे. दोन्हीही देशात लोकांन आपले विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य संघटीत होण्याचे स्वातंत्र व वाईट व चुकीच्या घटनेच्या विरोधात प्रदर्शन करण्याचे स्वातंत्र्य हवे होते. दोन्ही देशातील लोकांना तेथील अनेक राजकीय पक्षांनी मोकळ्या पणाने कार्य करण्यास सक्षम व्हावे असे वाटत होते.

बर्मा लिबियापासुन वेगळा देश होता कारण त्यांची सुरुवात लोकशाही व्यवस्थेपासुन झाली व ते नंतर लष्करी शासनाकडे वळला. त्याचवेळी लिबीयाची सुरुवात राज्य शाहीपासुन झाली व पुन्हा ते लष्करी शासना कडे वळला. दोन्ही देशात एक स्वस्त लोकशाहीचा विकास होईल अशी परिस्थिती नाही आहे. राजकीय दृष्टीने व विभिन्न जाती समुदायामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात विभाजन झाले. त्यामुळे त्यांचे राजकीय दृष्टया स्थरी होने कठिण झाले.

## लोकशाहीची वाटचाल The March of Democracy

17 व्या शतकात इंग्लडमध्ये आधुनिक लोकशाहीचा जन्म झाल्यापासुन संपुर्ण जगामध्ये लोकशाहीची आदर्श जपण्याकरीता हळुहळुने राजकीय व्यवस्थेचे रुपांतरण झालेले आहे. मुळता: लोकशाहीने सामाजिक वर्गाना मदत केलेली आहे. एक नविन प्रकारची सामाजिक क्रम व्यवस्था निर्माण करण्याकरीता प्रस्तुत समाजाने लष्करी नोकरशाही व राज्य शाहीचा विरोध केला. व जे लोक लोकावर शासन करण्याचा आमची जन्मजात विशेष अधिकार व दैवि हक्क आहे असे म्हणतात. त्याचा निषेध केला. 18 व 19 व्या शतकात हा बदल घडवुन आणण्याकरीता युरोप आणि अमेरीकेमध्ये खुप मोठी क्रांती घडुन आल्या.

औद्योगीकरण व वसाहतवादाची स्थिती संपुर्ण जगामध्ये निर्माण झाली. ज्यांनी लोकशाहीची मुल्य व आदर्शाचा अवलंब केला. अशा अनेक देशात सुशिक्षीत मध्यम वर्गाचा उदय झाला जे लोक लोकशाहीच्या आदर्शानी प्रेरीत झाले. जरी प्रत्येक राष्ट्रात विभिन्न सामाजिक व्यवस्था आणि विभिन्न समस्या असल्या तरी लोकशाही त्यासर्व समस्यांचे समाधान करते. तेव्हा प्रत्येक राष्ट्र त्यांच्या गरजेनुसार आधुनिक लोकशाहीचा विकास करण्यास अग्रसर झाले.

20 व्या शतकात आशिया आणि आफ्रिका मध्ये स्वतंत्र राष्ट्राची निर्मीती करण्याकरीता घोषवाक्य बनली. भारत, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका हे सर्व देश या प्रक्रियेचे उदाहरण आहेत. यापैकी काही देश स्वातंत्र्य मिळविण्याकस व स्थीर लोकशाहीची स्थापना करण्यास कार्यक्षम होते. तरीही त्याच्यापैकी काही राष्ट्र स्थिर लोकशाहीची निर्मीती करु शकले नाहीत. लष्करी हुकुमशाही स्थापित झाली. पाकिस्तान सारख्या देशात लष्करी हुकुमशाही व लोकशाही शासन एकानंतर एक चक्राच्या गतीप्रमाणे बदलत राहते. अशा अनेक देशामध्ये लष्करी सैन्याच्या नियत्रंणात असणारे लोक एक मजबुत लोकशाहीच्या स्थापनेकरीता संघटीत होऊन आंदोलन करीत आहेत. आपण लिबीया व बर्माचे उदाहरण पाहिले जिथे अशा प्रकारचे बदल नुकतेच सुरु झालेले आहेत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

20 व्या शतकात व्यवस्थेचे आणखी एक स्वरुप समोर आले आहे. त्याचा साम्यवादी व्यवस्था असे म्हणतात.साम्यवादी लोकांनी या गोष्टीवर विश्वास केला की संसदीय लोकशाही जी इंग्लंड मध्ये आहे. त्यान देशावर नियत्रण करण्याकरीता फक्त श्रीमंत भांडवलदारांना मदत केली. खरोखरच गरीब कामगार लोकांच्या हिताचे प्रतिनिधीत्व करु शकले नाही. त्यांनी असा विश्वास केला की, हे शक्य होते फक्त मजुरवर्गाच्या हुकुमशाहीच्या स्थापनेव्दारे ही हुकुमशाही ला कामगारांच्या खात्री करु द्याची गरज होती. श्रीमंत व शक्तीशाली जमीनदार व भांडवलदार यांना सत्ता मिळाली नाही. व त्यांना त्यांचे धोरण पुर्ण करण्याकरीता संधी मिळाली नाही. अशा प्रकारची राज्यव्यवस्थेची स्थापना 1917 नंतर पुर्व युरोपमध्ये 1949 नंतर चिनमध्ये आणि 1960 नंतर वेयतनाम, क्युबा इत्यादी. या देशानी साम्यवादी अर्थ व्यवस्थेची निर्मीती केली. ज्यामध्ये सर्व जमिन कारखाणे सरकाच्या नियत्रणात राहतात. शिक्षण, आरोग्य आणि रोजगार इत्यादीची सर्वासाठी खात्री केली जाते व समता समतेचे प्रमाण यांच स्थापना केली जाते.

असे असुनही हे देश विविध पक्षांच्या निवडणुका घेण्यास परवानगी देत नाही. व एकच पक्ष नेहमी अनेक दशक राज्य करत असते. त्यांनी प्रांताची स्थापना केली. ते प्रसारमाध्यामावर नियत्रण ठेवतात. व लोकांना संघटीत होण्याच्या व सरकारी योजनेचा विरोध करण्यास त्यांना लोकांना उघड सरकारच्या धोरणाविषयी टिका करण्यास व सरकार व दिली नाही. आशारितीने जरी ते मान्य करीत असले की ते गरीब जनतेच्या हितासाठी व 100% लोकशाहीची अमलबजावणी करीता त्याचे सरकार काम करत आहेत. पण वास्तविक पाहता त्यांनी लोकाचे स्वातंत्र हिरावुन घतले. 1992 मध्ये रशियाचे USSR तुकडे झाले. जसे तेथील लोकांनी इतर पाश्चिमात्य देशात जसे अमेरीकत असणाऱ्या लोकशाही व स्वातंत्र्याची मागणी केली. याच गोष्टीचे अनुसरण करत इतर अनेक रशियाचे लहान देश जसे रशिया, उक्रेन, इस्टोनिया आणि इतर पुर्व युरोपीयन देश जसे पोलंड व हंग्री इत्यादीनी साम्यवाद खतम केला व त्यांच्यासाठी संसदीय लोकशाहीची स्थापना केली. नक्कीच हे सवृ होणे सोपे नव्हते. त्यापैकी काहीजन सुध्दा लष्करी हुकुमशाही व्यवस्थेकडे वळले.

आज सर्व लोकांना गुतागुंताकीचे समस्या सोडवण्यासाठी व सर्वे लोकांच्या स्वातंत्र्याचे व हक्काचे रक्षण आदर करण्याकरीता लोकशाही व्यवस्था ही फारच छान व्यवस्था असु शकते. आज जगामध्ये नविन लोकशाही आमलात येत आहे. त्यामध्ये गरीबताला गरीब व खुप नाजुक आर्थिक स्थिती असलेल्यांना देखील आपला आवाज उच्च करण्याचा व सरकारी धोरणांवर प्रभाव टाकण्यास व सर्वासाठी न्याय व शांतीसाठी खात्री करुन घेण्यास कार्यक्षम असेल.

**महत्वाचे शब्द**

1. भटक्या गुराखी जमात
2. शहरीकरण
3. राजकीय भ्रष्टाचार
4. घरात नजरकैद
5. हुकुमशाही
6. लष्करशाही
7. सरंजामशाही पद्धत



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## तुमच्या अभ्यासात सुधारण करा

नकाशा: 1. 1900 ते 1915 मधील लोकशाही शासन




नकाशा: 2. 2011 मधील लोकशाही शासन




1(a). या नकाशाच्या आधारावर तिन देश ओळखा (काही बाबतीत तुम्हाला तीन देशाचे नावे मिळणार नाहीत) जे या खंडामध्येग सांगीतलेल्या वर्षामध्ये लोकशाही प्रशासन देश होते. आणि सारणी बनवा पुढच्या पानावर दिलेली आहे. ($AS_5$)

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

| वर्ष | आफ्रिका | आशिया | युरोप | दक्षिण अमेरीका |
|---|---|---|---|---|
| 1900 | | | | |
| 2011 | | | | |

b) 2011 मध्ये आफ्रिके मधले लोकशाही प्रधान बनलेले काही देश ओळखा.

c) मोठ्या देशाची यादी बनवा जे 2011 मध्ये लोकशाही देश नव्हते?

2. अनेक देश अनेक घोषणा करतात. त्यांची सरकार लोकशाही प्रधान देश आहे कारण त्यांनी निवडणुका घेतल्या म्यानमार आणि लिबीया या देशासंबंधी हे कसे घडले? (AS1)

3. राज्यकर्ते प्रसार माध्यमावर नियत्रंण करण्याचा प्रयत्न करतात असे तुम्हाला का वाटते? तुमच्या भागात प्रसारण माध्यमावर कसे नियत्रंण केले जाते हे तुम्हाला माहित आहे का? (AS1)

4. लिबिया आणि म्यानमार विषयी समजुन काल्पनिक डायलाग लिहा? त्यादेशातील लोकशाही साठी घडलेल्या घटना आणि लढा यांची तुलना करा. (AS6)

5. साक्षरता आणि सर्व लोकांचे शिक्षण लोकशाहीच्या कामकाजासाठी कशी मदत करते?(AS6)

6. लोकशाही आणि हुकुमशाही मध्ये काय फरक आहे? (AS1)

7. म्यानमार मध्ये लोकशाही आणण्याकरीता आउंग सन सु की ने कशी भुमिका निभावली? (AS1)

8. या पाठातील आखरीचा उतारा वाचा आणि प्रश्नाचे उत्तर द्या? नविन प्रकारची लोकशाही काय आहे? (AS2)

## प्रकल्प कार्य

वर्तमान पत्र वाचा आणि लिबीया किंवा इजिप्त किंवा इतर देशामध्ये लोकशाही साठी झालेल्या लढाई संबंधी काही माहिती लिहा. तशा वार्ताची फाईल तयार करा आणि वर्गामध्ये दाखवा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# लोकशाही - विचारश्रेणीची भावना

धडा 18



*Fig. 18.1:* जर तुम्ही कर भरत असाल तर मत टाका



*Fig. 18.2:* जर तुम्ही शिक्षित असाल तर मत टाका



*Fig. 18.3:* तुम्हींजर स्त्रि असाल तर मत अधिकार नाही

17 व 18 व्या शतकात इग्लंड, अमेरीका, फ्रांन्स इत्यादी देशात लोकशाही सरकार प्रारंभ करण्या बद्दल एवढ्यात लुबिया, म्यानमार सारख्या देशात लोकशाही साठी होत असलेल्या आंदोलना बद्दल तुम्ही वाचन केले आहे. लोकशाही मार्गात अनेक चढ उतार आहे. त्यातुन लोकशाही सरकार स्थापन झाले. लोकशाही असणाऱ्या देशात लोकप्रतिनिधींची निवड करण्यासाठी फक्त काही मर्यादीत लोकच भाग घेतात. लोकशाहीची भावना हळु हळु विकसित होत आली. अशाच वेळी लोकशाही विषयी बरेच प्रश्न निर्माण झाले त्याचे उत्तर देणे पण अवघड झाले. त्यापैकी काही प्रश्न पाहु या. या प्रश्नांची तुमच्या वर्गात व वर्गाबाहेर मित्रांशी चर्चा करा.

**लोकशाही म्हणजे जबाबदार सरकार Democracy Means Responsible Governments** ज्या जनतेने निवडुन दिले त्याच्यसाठी जबाबदार असणारे सरकार) लोकशाही म्हणजे जनते पासुन अधिकार प्राप्त करुन त्या बद्दल जबाबदारी निभावणारे सरकार यात लोकप्रतिनिधी जेव्हाचे तेव्हा काही कामासाठी (3 किंवा 5 वर्षासाठी) निवडल्या जातात.

लिबिया मध्ये शेवटचा अधिकार Revolutionary Command Council (RCC) स आहे. हे जनतेचे निवडणु दिलेले संघ नव्हे. आपले आपण नेमणुक केल्या गेलेली संघटना आहे. जनतेच्या इच्छा आकांक्षा त्यांचे आदेश पालन करण्याचे काम या संघटना करत नाही.

लिबिया जनतेचे निवडुन दिलेल्या शासन सभा आहेत पण त्या स्वतंत्र निर्णय घेऊ शकत नाहीत. RCC च्या आदेशाचे पालन करावे लागते. त्यांना सोडुन इतर कुणालाही RCC जबाबदार राहत नाही. लोकशाही देशात लोकप्रतिनिधिचे स्थान फक्त महत्वाचे असते. लोकाकडुन निवडल्या गेलेले प्रतिनिधीना त्यांच्यावर अन्याय करता येत नाही.

निवडुन आलेले लोकप्रतिनिधी वेगवेगळ्या पध्दतीने जनतेस जबाबदार असतात. निवडलेले सभासदर शासन सभेत सरकार तर्फे प्रतिनिधी म्हणुन सरकारच्या कामाची माहिती द्यावी लागते. व काम योजना यांना या सभागृहाची मंजुरी घ्यावी लागते. सरकार करत असलेल्या कामा विषयाचा समाचार कोणताही नागरीक विचारु शकतो.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

तो समाचार देण्याची जबाबदारी सरकारवर असते. या सर्वांचा विशिष्ट काळ असतो. त्या नंतर पुन्हा निवडणुका असतात. लोकप्रतिनिधीणा पुन्हा जनतेचा विश्वास प्राप्त करावा लागतो. त्यांनी केलेल्या कामाची माहिती देतात. व ती संतोषजणक असेल तर पुन्हा निवडणु देण्याचा पुर्ण हक्क लोकांचे असतो.

- निवडुन आलेल्या लोकप्रतिनिधीवर लांखो गरीब लोंकावर खरोखर नियंत्रण असु शकते का? लोकशाही म्हणजे लोकांचे सरकार का लोकप्रतिनिधी व्दारे चालवल्या जाणारे सरकार? सरकारच्या दैनंदिन कार्यक्रम जनता कशा प्रकारे सहभागी होऊ शकते? यावर वर्गात आणि घरात चर्चा करा?

**समानता व सर्वांना मिळुन मिसळुन चालणे लोकशाहीवर आधारुन आहे: Democracy is based on equality and inclusiveness:** जनतेचे सरकार म्हणजे सर्व प्रौढ लोक असा अर्थ ते पुरुष असो की, स्त्रि असो श्रीमंत असो वा गरीब असो. गोरा असो वा काळा हिंदु असो ख्रिश्चन, मुस्लिम, नास्तिक किंवा कोणताही भाषा बोलणारा असा. या भावनेचा विकास होण्यासाठी बराच काळ घालावा लागला. साधारपणे निवडणुकीत मतदानाचा हक्क प्राप्त करतात. प्रथम संपत्ती असणाऱ्या कांही लोकांनाच मतदानाचा हक्क असे. हळु हळु कांही देशात या हक्कास गरींबना पण देण्यात आला. त्यानंतर स्त्रियांना प्राप्त झाला. शेवटी सर्व मतधर्माचे लोकांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला.



Fig. 18.4: तुम्ही वेगळ जमातीचे असाल तर तुम्हाला मतदानाचा हक्क नाही



Fig. 18.5: वयाने लहान असाल तर मतदानाचा हक्क नाही

गोऱ्या लोकांना महिलांना 1920 पासुन अमेरीका मतदानाचा हक्क प्राप्त करुण देत आहे. काळ्या जातीच्या लोकांवरील मतदानाचे हक्काचे बंधन 1965 मध्ये काढुन टाकाण्यात आले. सर्व वर्गाच्या लोकांना मतदानाचा हक्क प्राप्त केलेल्या पैकी न्युझिलंड सर्व प्रथम देश आहे. न्युझिलंड मध्ये सर्वांना मतदानाचा हक्क 1893 मध्ये प्राप्त झाला. हा प्राप्त करण्यासाठी स्त्रिया व आदिवासीयांनी आंदोलने केली. सार्वत्रिक मतदानाचा हक्क प्राप्त करुन देणारा सर्वात प्रथम मोठा देश (रशिया) USSR 1917 च्या क्रांतीनंतर सर्वांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. एवढ्यात काही देश काही समुहाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसुन येत आहे. व तसे कायदे करत आहेत.

- एस्तोनियाने नागरीकत्व कायदा निर्माण केल्यागेल्या पध्दतीमुळे रशियात राहणारे अल्पसंख्याक जनतेना मतदानाचा हक्क मिळणे अवघड झाले.
- फिजीलोतील निवडणुक पध्दती प्रकारे भारतीय-फिजीयन मतदाना पेक्षा स्थानिक फिजीयन मतदानास जास्त महत्व असे. 2013 पासुन मात्र समान महत्व असणारे राजकीय समानता सर्वांना मिसळुन घेणे या सुत्रावर लोकशाही आधारीत आहे. लोकशाहीत नागरीत्व असणाऱ्या प्रत्येक वयो व्यक्तीस मतदानाचा हक्क असावा. 21 वर्षावर जास्त वय असलेल्या सगळ्या नागरीकांना आपले संविधान मतदानाचा हक्क देते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

- आज सुध्दा अनेक देश इतर देशातुण आलेल्या लोकांना मतदान हक्क प्राप्त करुन देत नाहीत. अमेरीकेत गेलेल्या दक्षिण आफ्रिका लोकांची परिस्थिती फ्रांन्स किंवा जर्मनीस गेलेल्या टर्कीश लोकांची परिस्थिती हीच आहे. भारत देशा सहीत जगात सर्वत्र विदेशी लोक आढळतात. लोकशाही सारख्या देशात त्यांचा सहभागाची आवश्यकता नाही का? सर्वांना समान मतदानाचा हक्क असेल तर कमी संख्येत असणारी एका मतांची किंवा एका भाषा बोलणाऱ्या लोकांवर अधिक संख्या असणारी लोक त्यांचे वर्चस्व गाजवत असतात हे न्यायिक आहे का? विविध प्रकारच्या लोकांना लोकशाहीत भाग घेण्यासाठी हे उपयोगी पडते का?

**लोकशाही करीता नागरिकांचा सक्रिय सहभाग Democracy requires active participation of citizens:**

लोकशाही म्हणजे केवळ निवडणुकीत भाग घेऊन निवडुन येणे एवढेच सोपे झालेले दिसुन येते. पण लोकशाही म्हणजे सरकारी पध्दत व कायद्या तयार करण्या बाबत व ते अमल करण्याकरीता पण लोकांचा सहभाग असावा. हे कसे शक्य होऊ शकते? सर्व जनता मुक्त पणे निर्भय पणे सहभाग घेऊन आपल्या गरजा विचार स्पष्टपणे व्यक्त करतील व त्या वेळेस हे साध्य होऊ शकते. स्वतंत्र नागरीकाचे समुह तयार होऊन कायदा पध्दतीने योग्य प्रकारे अमल होईल या कडे लक्ष द्यावे. पण लोक अशा प्रकारे सहभाग घेईल असे वाटत नाही.



चित्र. 18.6 लोकांची सत्ता - हा चेलबार्ड कसा बदलेल?

अनेक देशात निवडुण आलेल्या प्रजा सहभाग प्रोत्साहीत करत नाहीत. उलटे त्यात अडथळा आणण्याचा प्रयत्न सरकार करीत असते. लोकांनापण सरकारच्या व्यवहरात जास्त जास्त हस्पक्षेप न करता प्रचार केला तरी 2012 अमेरीका अध्यक्ष निवडणुकीत 40% पेक्षा जास्त लोक आपल्या आहे हक्काचे उपयोग घेतले नाहीत.

- सरकारी कामकाजात सहभाग घेण्यासाठी लोक का आवड दाखवत नाहीत? योग्य ज्ञान नसल्यामुळे का आवड नसल्या मुळे का आपल्या विचाराची कोणी किंमत करत नाहीत असे समजुन सहभाग घेत नाहीत?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**लोकशाहीत लोकांना मुल्की, नागरी हक्क असावेत Democracy requires civil liberties:** लोकशाहीत लोकांना, माहित करुन घेण्याचा चर्चा करण्याचा, स्वतंत्रपणे विचार व्यक्त करण्याचा, संघटना करुन आपल्या मागण्या मागण्याचा अधिकार लोकांना असेल तरच ते निर्णय घेण्यासाठी सहभाग होतात. यालाच नागरीकाचे हक्क असे म्हणतात. पण हे हक्चक जनतेना तेवढ्या सहजपणे मिळणे शक्य नाही. बोलण्याचा, स्वतंत्रपणे संघटना बनवणे. सरकारच्या कार्यकाल विषयी माहित करणे, अशा हक्कावर सरकार नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत असते. सरकारी निर्णय बऱ्याच वेळेस गुपित ठेवल्या जातात. यास पत्रिका पुस्तके, सेन्सार करुन सकारच्या विरोधात असणारे विचार छापल्या जात नसत. जनतेला हवे असणारे संस्था कामगार संघटना राजकीय पार्टी तयार करण्यासाठी अनुमती दिल्या जात नसे एका पक्षांस किंवा अनुमती मिळालेल्या पक्षास प्राधान्य दिल्या जात असे. सार्वजनिक मतदानाचा हक्क कांही वर्षानतर निवडणुका असल्यातरी रशिया (यू.एस.एस.आर) लोकांस वरील पैकी बरेच हक्क प्राप्त नाहीत. त्याकरीता तिथे 60 वर्ष एकच पक्षांचा अधिकारावर असलेली दिसुन येते. आता पण सर्व देशातील लोकांना हे हक्क मिळल्या जात नाहीत.

- अनेक सरकार लोकांस प्राथमिक हक्क देतात. तर मग लोकांचे फोन टॅपिंग करणे, त्यांचे पत्र वाचणे, त्यांच्या दैनंदिन कार्य कृतीवर नजर ठेवणे, अशी काम करत असते. हे कितपत योग्य वाटते?

नागरीकांचे हक्क नियत्रीत केल्या बद्दल सरकार सत्तेवर नियमित चालण्याची शक्यता असते व तसे ते प्रयत्न करीत असतात.

**लोकशाहीत समानत्व पाहिजे Democracy requires equality:** लोकशाहीत राजकीय समानत्व प्रति व्यक्तिस एक आहे. असावा हे आपण पाहिलोत. तर हा राजकीय समानत्व प्रभाव पडावा म्हणजे सामाजिक आर्थिक पदावर पण समानत्व असावे. समाज श्रीमंत गरीब तसेच उच्च निच्च जातीत विभाजीत केल्या गेले तर राजकीय समानत्वास अर्थ राहणार नाही. उन्नत पदावर व श्रीमंत लोक त्यांच्या अनुकुल मतदान करण्यासाठी इतर सामान्य गरीब लोकांवर दबाव टाकत असतात. बऱ्याच कुटुंबातील वडील व्यक्ती हा मतदान कुणास टाकायचे हे सर्व कुटुंबियांना सांगत असतो. व त्याच प्रमाणे त्या निर्णयानुसार सर्वजन मतदान करतात.कांही प्रांतात सावकार लोक कामगार लोक यांना त्यांचे मालक तुम्ही आमच्या हाताखाली काम करता आम्ही सांगतो त्यांनाच मतदान करा असा दबाव टाकत असतात. लोकशाहीत सत्ता वापरासावर सत्ता प्राप्त करण्याचे हे उदाहरण आहे. लोकशाहीत धनिक श्रीमंत लोक आणखी

**तक्ता 1 मध्ये सर्व देशातील सर्व मार्गाने मिळणारे एकुण उत्पन्न**

| देशांची नावे | देशाची एकुण उत्पन्नातील भागीदारी | |
|---|---|---|
| | 20वरुन | 20 खालुन |
| दक्षिण आफ्रिका | 64.8 | 2.9 |
| ब्राझील | 63.0 | 2.6 |
| अमेरीका (USA) | 50.0 | 4.0 |
| लंडन (United Kingdom) | 34.5 | 9.6 |
| डेन्मार्क (Denmark) | 34.5 | 9.6 |
| हंगरीं (Hungary) | 34.5 | 10.0 |

- लोकशाही अनुसार लोकांच्या हितासाठी कामकरणारी सरकारे असुन सुध्दा अनेक देशात तिवृरुपात असमानता का चालत आहे?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

वेगवेगळ्या पध्दतीन हस्तक्षेप करत असतात.अमेरीका सारख्या अनेक देशात अनेक प्रसारराची साधणे श्रीमंत, धनिक, कार्पोरेट संस्था वि व्यक्तिच्या हातात असतात. कशाचा जास्त प्रसारण करतात व कशाचा प्रसारण करत नाहीत त्यानुसार हे लोकांच्या विचारांची कदर करतात. संपन्न व शक्ती असणारे शासन सभासद, मंत्री उपलब्ध असतात. त्याकरीता त्यांच्या पध्दती व कामाचा कार्यक्रमाचा प्रभावित करु शकतात.

- एकच पक्ष पुन्हा पुन्हा सत्तेवर येत आहे म्हणजे जनता त्या पक्षाला निवडुण देत आहे. असा त्याचा अर्थ किंवा पर्याय नाही किंवा पर्यायी असणाऱ्या पक्षांस सरकार मतदान हक्क देऊ देत नाही असा त्याचा अर्थ. खालील दिलेल्या तिन उदाहरणा व्दारे उत्तर द्या.

a. 1930 मध्ये मेक्सीकोला स्वतंत्र आल्यानंतर प्रत्येक सहा वर्षांनी निवडणुक होऊ लागले. हा देशात सैनिक किंवा हुकुमशाही शासन कधीही नव्हते.पण 2000 वर्षापर्यंत PRI (Institutional Revolutionary Party) नावाची एकच पक्ष प्रत्येक निवडणुकीत विजय प्राप्त केली. विरोधी पक्षांच्या निवडणुक लढत पण विजय प्राप्त करत नसत. निवडणुकीत विजय प्राप्त करण्यासाठीPRI नावाच्या गैर पध्दतीचा उपयोग सत्ताधारी पक्ष करत असत. सरकारी शिक्षक हे PRI ला मतदान टाका म्हणुन पालकांना दबाव टाकत असत.

b. अल्पसंख्याक गोऱ्या लोकांच्या पालनातुन झिंम्बावेला 1980 मध्ये स्वतंत्र प्राप्त झाले. तेव्हा पासुन देश स्वतंत्र आंदोलनांचे नेतृत्व करणारे ZANU-PF या पक्षाचा विजय प्राप्त केली व देशाचे सरकार शासन साभांळत आहे. त्या पक्षाचा नेता राबर्ट मुगाबेRobert Mugabe स्वतंत्र प्राप्ती पासुन अध्यक्ष आहे. मुगाबावेस अनेक लोकांचा आधार मिळत आहे. पण निवडणुकीत बऱ्याच गैर पध्दतीचा उपयोग घेत असतो. अध्यक्ष अधिकाराता वाढ करुन तो कुणास जबाबदार न राहता देशाच्या राज्यघटनेस कित्येक वेळा बदलुन टाकत आला. विरोधी पक्ष कार्यकर्ते यांची छेडछाड केल्या जात असे. ते सभेत अडथळे आणतात. अध्यक्षावर आरोप करण्यासाठी नियंत्रीत प्रकारच्या एक कायदा आहे. टेलीविजन रेडीओ शासनाच्या ताब्यात आहेत. अधिकारावर असणाऱ्या पक्षाचेचे हे प्रसारण करीत असतात.

c. चिन देशामध्ये संसदच्या निवडणुकीला प्रत्येक 5 वर्षास क्रम न चुकता निवडणुका घेतल्या जातात. Daibiao Dahui (National People's Congress)देश अध्यक्ष नेमणुक करण्याचा अधिकार असतो. चिनच्या सभेत जवळपास 3000 सभासद निवडल्या जातात. कांही सभासदास सैन्य निवडणुक करत असते. निवडणुकीत निवडणुक लढव्या अगोदर चिन कम्युनिस्ट पक्षाची मंजुरी उम्मेदवारांनी घ्यावी लागते. 2002-03 मध्ये झालेल्या निवडणुक लढण्यास मंजुरी दिल्या गेली. कम्युनिस्ट पक्षाच प्रत्येक वेळेस सरकार स्थापित करत असते.

**लोकशाहीत स्वतंत्र व निपक्षपात पणे निवडणुका पाहिजेत Democracy requires free and fair elections:** एका देशाची जनता सरकारमध्ये खरोखरच लोकप्रतिनिधी योग्य त्या व्यक्तिना किंवा पक्षाची निवड करावी म्हणजे निवडणुक ही निपक्षपात स्वच्छ व कोणत्याही प्रकारच्या भयभित वातावरणात न घेणे हे फार महत्वाचे आहे. म्हणजे निवडणुकी वेळेस कोणत्याही अशा पक्षांस सवलती दिल्या जात नाहीत. कोणताही पक्ष असो अथवा व्यक्ती असो निवडणुकीत त्यास भाग घेता येतो. रशिया, म्यानमार, लिबीया अशा अनेक देशात एक किंवा दोन पक्षच निवडणुकीत उभे रहाण्याचा अधिकार दिल्या जातो. त्यांनाच फक्त जनतेनी मतदान टाकावा लागतो. असा दबाव



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

सत्ताधारी पक्ष किंवा सरकारी कामगार जनतेवर दबाव टाकत असतात. एकएका वेळी विरोधी पक्ष्याचे अनामत नाकारले व प्रतिपक्षाची मतदाराची नावे मतदान यादीतुन काढण्यात येते अशा प्रकारची कार्य सत्ताधारी पक्ष करीत असते. कशातरी आडत्त्या तिडव्या पध्दतीने निवडणुक घेणे चालत नाही. राजकीयात योग्य त्या व्यक्तीची निवडकरण्याची संधी प्राप्त करुन द्यावी. जनतेणा या निवडणुकी द्वारे सध्या सत्तेव असलेल्या पार्टीस विरोध करु शकतात. लोकशाहीवर विश्वास वाढावा म्हणजे निवडणुकीवर लक्ष केंद्रीत करणे फार महत्वाचे आहे. तर निवडणुकीच्या अगोदर व नंतरच्या होणाऱ्या घटनेचा पण विचार करणे महत्वाचे आहे.निवडणुकी अगोदर राजकीय विरोधा सहीत सर्वसाधारण राजकीय कार्य साठी संधी दिल्या जावे. म्हणजे लोकांच्या हक्काचे सरकार गौरव करीत असते. त्यामुळे सध्या सत्तेवर असणारे पराजयी होतात. त्यामुळे निपक्ष व स्वतंत्र निर्भयपणे खुल्या वातावरणात निवडणुका घ्याव्यात.

**लोकशाही ही कायदा, अल्पसंख्याक लोकांचा गौरव करणारी असावी:**

**Democracy requires respect for law and minority opinion:** लोकशाही म्हणजे लोकांकडुन निवडुण दिलेले सरकार हे खरे पण लोकांकडुन आलेले नेते लोकांच्या अडी अडचणी, मागण्या पुर्ती करीत असलेले दिसुन येत नाही. लोकशाही शासनात कायद्याचा गौरव केला पाहिजे. कायद्यात केलेल्या उलेखा प्रमाणे न्यायव्यवस्था व कार्यनिर्वाहिन व्यवस्था स्वंतत्र असल्या पाहिजेत. जनतेतील वेगवेगळ्या विचारांच्या लोकांना शासनामार्फत स्वरंक्षण असावे ते विचार जास्तीत जास्त लोकांना मान्य असेल तरी ते अयोग्य असले असे वाटत असले तरी तसे विचार व्यक्त करण्याचा हक्क व त्याचा प्रसार करण्याचा हक्क व इतरांना समजावुन सांगण्या सारख्या हक्काचा गौरव करावा. लोकशाहीत उत्पन्न होणारा सर्वात मोठा प्रश्न तो म्हणजे लोकशाही विरोधी भावना असणाऱ्या लोकांशी लोकशाहीच्या जागी नियंत्रण असावे असे म्हणणाऱ्यात एक प्रत्येक वर्गाच्या लोकांना किंवा प्रत्येक प्रदेश जाती प्रजेना अधिकार असावा असे विचारांच्या लोकांशी योग्य पध्दतीने व्यवहार करणे या विचारांचे प्रचार करावे का नाही?

**निवडझुका व लोकशाहीवर उठणारा प्रश्न**

आपल्या देशाच्या निवडणुका एका उदाहरण घेऊ या. एका प्रदेशात राहत असणाऱ्या हजार लोकांना मतदानाचा हक्क आहे असे समजु या तर सर्वसाधारण पणे निवडणुकीत 60% पर्यंतच लोक मतदान करतात. म्हणजे 600 लोक मतदान करतात व निवडणुकीत 10 लोक निवडणुक लढविणारे आहेत असे समजु या. विजयी उमेदवारास 250 मत, दुसऱ्या उमेदवारास 200 व बाकी 8 उमेदवारांना मिळुन 150 मत पडलेत असे समजु या. तर 250 मत घेणाऱ्या व्यक्तिस विजयी घोषीत करतात. त्या प्रदेशात राहत असणाऱ्या लोकांच्या कल्याणासाठी निवडुण आलेला व्यक्ती कितपत लक्ष देता? विजयी व्यक्ती 25% मत फक्त पडलेली आहेत. तर या अशा प्रकारच्या लोकशाहीत कितपत न्याय होऊ शकतो? निर्णय घेणाऱ्या संस्थाना किंवा लोकप्रतिनीधींना निवड करण्यासाठी दुसरी काही पध्दत आहे का?

काही असो लोकशाहीत कायदा नागरीकांचे हक्क यांचा उत्तम पध्दतीने लोकशाही सरकारामध्ये अमलबजावणी व्हावी व प्रजाच्या कल्याणासाठी काम करावे.

## लोकशाही - बहुमत विरुद्ध समाविष्ट

लोकशाही मध्ये अधिक संख्या असणारे लोक शासन हस्तगत करत असतांना कोणत्याही देशात वेगवेगळ्या संस्कृती वेगवेगळ्या विचारांची लोक राहतात. अशा लोकशाहीनुसार कशाप्रकारे सोडवल्या जाते? आपण बहुमत असणाऱ्या लोकांच्या अनुकुल निर्णय घेतात.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

म्हणजे निवडणुक घेतल्या नंतर जास्त लोकांच्या मतांचे स्विकार केला जातो. बऱ्याच लहान लहान विषयात ही पध्दत बरीच उपयोगी पडते. एक समुह किंवा वर्गाच्या लोकांच्या संबंधात एकदाम समस्ये बद्दल कार्यभेद येतात. व जास्त लोक बहुमत वर्गाच्या बाजुने आपली बाजु घेतात. त्यामुळे अल्पसंख्याक लोक दुर होतात. अशा वेळेस अल्पसंख्याक व अधिक संख्या असणाऱ्या लोकांना मिसळुन चालण्याचे काम शासनाने करावे, या बद्दल दोन उदाहरणे पाहु या.

## बेल्जियम आणि श्रीलंका

बेल्जियम हा युरोपमधील एक लहान देश. देशातील एकुण लोकसंख्येपैकी 59 टक्के फ्लेमिश प्रांतात राहतात. आणि डच भाषा बोलतात. अजून 40 टक्के लोक वालोनिया प्रांतात राहतात आणि फ्रेंच भाषा बोलतात. उर्वरीत 1 टक्के जर्मन भाषा बोलतात. ब्रुसेल्स जी राजधानी आहे, त्यात 80 टक्के फ्रेंच भाषा बोलतात आणि 20 टक्के भाषा बोलतात.

अल्पसंख्य फ्रेंच भाषा बोलणारे श्रीमंत आणि शक्तिशाली आहेत. डच भाषा बोलणाऱ्यांना यांची चिड येत असे. याचा परिणाम म्हणजे 1950 आणि 1960 च्या दरम्यान ह्या डच आणि फ्रेंच भाषिक समुदायांमध्ये तनाव निर्माण झाला. ब्रुसेल्समध्ये ह्या दोन समुदायातील तनाव फार तीव्र होता. ब्रुसेल्सनी एक समस्या दिली, डच भाषिक लोक देशामध्ये बहूसंख्यक होते पण राजधानीमध्ये अल्पसंख्यक होते.




*चित्र 1: बेल्जियममधील प्रांत आणि समुदाय*

श्रीलंका एक बेट राष्ट्र, भारताच्या दक्षिणेस आहे. श्रीलंकेत पण विविध प्रकारची लोकसंख्या आहे. महत्वाचे सामाजिक गट, सिंहला भाषिक 74 टक्के आणि तमिल भाषिक 18 टक्के. बहुतांश सिंहला भाषिक लोक बौद्ध आहेत. बहुतांश तमिल हिंदू किंवा मुस्लिम आहेत. ह्या दोन्ही देशात बहुसंख्य समुदायांचे मत चालेल का? आता, ह्या दोन्ही देशांमध्ये काय घडले ते पाहू या.

## श्रीलंकामध्ये बहुसंख्यावाद

1948 मध्ये श्रीलंकेस स्वतंत्र्य आल्यानंतर सिंह भाषा धर्माचे लोक त्यांना असणाऱ्या अधिक लोकसंख्याच्या बळावर शासनावर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करु लागले. याचा परिणाम लोकशाहीनुसार निवडल्या गेलेले सरकार सिंहभाषा असणाऱ्या अधिक संख्या लोकांच्या दबावा खाली येऊ लागले.

तामील भाषा पर्वा न करता, सिंहभाषा ही शासकीय कायदेशीर भाषा म्हणुन अमलकरण्यात आले. सरकारी नौकरी मध्ये सिंह भाषा बोलणाऱ्या लोकांना जास्त राखिव जागा असत. नविन राज्यघटनेनुसार सरकारने बौध्द धर्माचे रक्षण केले पहिजे आणि प्रोत्साहन दिले पाहिजे. अशा प्रकारच्या सरकारच्या कार्यामुळे तामीलवासियाना आपणास वेगळे केल्या जात आहे अशी भावना निर्माण होऊ लागली. याचा परिणाम सिंहजाती लोकामध्ये व तमील जाती लोकांमध्ये संबध बिगडल्या जाऊ लागले. समान दर्जा मिळण्यासाठी श्रीलंकन तमिल लोकांनी नवे पक्ष आणि संघर्ष सुरु केले, तमिल लोक राहत असलेल्या प्रांतांना स्वायत्ता (आटोनोमी) कित्येक वेळला फेटाळण्यात आली. याचा



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

*चित्र 1: श्रीलंकेतील पारंपारीक समुदाय*




परिणाम 1980 च्या काळात, उत्तर श्रीलंकेत आणि पुर्व श्रीलंकेत अनेक राजकिय संघटना निर्माण झाल्या, ज्यांची मागणी म्हणजे स्वतंत्र तमिळ इलम राष्ट्र होय.

दोन्ही वर्गाच्या लोकामध्ये विश्वास नसल्यामुळे संघर्ष वाढल्या गेला. एलटीटीई ही आतंकवादी संस्था तमील राहत असणाऱ्या काही प्रदेशात स्वतंत्र शासनाच्या मागणी साठी स्थापित करण्यात आली त्यामुळे अंर्तगत सुद्ध सुरु झाले,. अंतर्गत युध्द होऊ लागले. या युध्दात श्रीलंका सैन्याने एलटीटीई आतंकवादी संस्थावर विजय मिळवला व तामिल जातीच्या हजारों लोकांना मारुण त्यांना असमर्थ करुन त्या प्रदेशावर ताबा मिळविला. बऱ्याच कुटूंबांना देश सोडून देश सोडून निर्वासित होण्यास भाग पाडले. देश सोडुन कांदीसिका मध्ये मिसळल्या गेले. तर कित्येक कुटुंब आपला जिवनाधार गमावुन बसले. या नागरी युध्दाच्या अगोदर आर्थिक विकास, विद्या, अरोग्य, यांचा विकास श्रीलंकाने केला होता. पण अंतर्गत युध्दामुळे देशातील सामाजिक, सांस्कृतीक व आर्थिक जिवन विस्कळीत झाले.

## बेल्जीयममध्ये निवासाची सोय.

बेल्जीयमचे नेते वेगवेगळ्या पध्दतीचा वापर करत. त्या नेत्यांनी प्रादेशिक भेद, सांस्कृतीक विविधतेचे अस्तित्व ओळखले. एकाच देशात वेगवेगळ्या प्रकारचे लोक राहण्यासाठी व अनुकुल परिस्थिती निर्माण करण्यासाठी 1970 व 1993 मध्ये देशाच्या राज्य घटनेतेस चार वेळेस बदलल्या गेले. त्यांनी केलेली व्यवस्था बरीच सृजनात्मक व इतर देशाच्या स्थापने पेक्षा वेगळी आहे. बेल्जीयमने स्विकारुन आमलात आणलेली कांही मुद्दे

- राज्यघटने प्रकारे केंद्र सरकारात डच, फ्रेंच भाषा बोलणारे मत्री समान संख्यात असावेत. काही विशेष कायद्या करीता प्रत्येक भाषा गटातील अधिक टक्के लोकांची मदत असावी म्हणजे कोणताही एक समुह एक पक्ष निर्णय घेऊ शकत नाही.
- केंद्र सरकार अधिकारातील बऱ्याच अधिकारास देशातील दोन्ही प्रदेशातील राष्ट्र सरकारात विकेंद्रीकरण केल्या गेले. केंद्र सरकारच्या नियत्रंणात राज्य सरकार काम करीत नाही.
- ब्रुसेल्सची वेगळी सरकार आहे. यात दोन्ही वर्गाना समान अधिकार प्रतिनिधीत्व आहेत. डच भाषा बोलणाऱ्या लोकांस केंद्र शासनात समान प्रतिनिधीत्वा साठी मान्य केल्या बद्दल फ्रेंच भाषा बोलणारे लोकांना ब्रुसेल्य सरकारात समान प्रतिनिधीत्व देण्याचे मान्य केल्या गेले.

केंद्र व राज्य सरकारच नाहीतर तृतिय सरकारपण आहे. या *प्रजा सरकाराच* ते कुठेही राहत असले तरी एका भाषा संबंधी डच, फेंच व जर्मण प्रजा निवडतात. संस्कृती, विद्या, व भाषा संबधीत मुद्दयावर या सरकारला अधिकार असतात.

बेल्जीयमची पध्दत बरीच गुंतांगुतीची असल्यासारखे तुम्हास भासु शकते. पण या सारख्या आता पर्यंत चांगल्या प्रकारे काम करीत आल्या आहेत. ही व्यवस्था दोन मुख्य समुदायामधील नागरी संघर्ष आणि भाषेच्या आधारावर देशाचे विभाजन टाळण्यासाठी



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

उपयोगी ठरली. युरोपात अनेक देश एकत्रित येऊन युरोपीयन युनियन म्हणुन स्थापित झाल्यावर, त्याचे मुख्य कार्य स्थळ म्हणून ब्रेसल्सची निवड करण्यात आली. न्यायाप्रमाणे व्यवहराचा विश्वास बेल्जीयम वर ठेवल्यासारखे झाले. बेल्जीयम आमल करीत असलेल्या पध्दतीस हे एक महत्वाचे आहे.

बेल्जीयम व श्रीलंका या दोन उदाहरणावरुन आपण काय शिकु शकतो? दोघेही लोकशाही देशच. तर, अधिकाराचा वाटपा बद्दल मात्र दोन्ही देश वेगवेगळ्या पध्दती वापर करतात. विविध समुदाय आणि विविध प्रदेशातील लोकांच्या भावना आणि आवडीचा आदर केला. हे तरच देशात एकता असु शकते. हे बेल्जीयम नेत्यांना कळुन आले. अधिकारांचे वाटप करण्याकरीता सर्वांना मान्य अशी व्यवस्था त्यांनी केली. श्रीलंकेचे उदाहरण या पेक्षा वेगळे आहे. अधिक संख्येत असणारे लोक अधिकाराचे वाटपा बद्दल मोकळ्या पणाने न राहता आपले वर्चस्व इतरांवर गाजवावे, असा प्रयत्न केल्यामुळे देशाची एकता धोक्यात येते व अंतर्गत संघर्ष आणि नागरीकत्त्वासाठी युध्दा ह्यामुळे देश शेकडो वर्ष मागे पडतो. हे त्यातुन सिध्द होतो.

## नागरीकांचा गौरव आणि स्वातंत्र्य

व्यक्तिच्या गौरवांना, स्वतंत्र्यांना बढावा देण्यात वेगवेगळ्या प्रकारच्या सरकारात लोकशाही यशस्वी झाली. प्रत्येक व्यक्तिस इतर व्यक्तिकडुन मानसन्मान मिळावा अशी भावना असते. हवा तेवढा मान सन्मान मिळत नाही. त्यामुळेच त्यातुन व्यक्ति व्यक्ति मध्ये तनाव निर्माण होतो. मानसन्मान व स्वतंत्र हेच लोकशाहीचा पाया आहे. विश्वभर या बद्दल लोकशाही सरकार असणाऱ्या देशांनी मान्य केले आहे. यास वेगवेगळ्या लोकशाहीत वेगवेगळ्या पध्दतीने स्विकारले आहे. जो समाज काळानूकाळ वर्चस्व आणि खालच्या दर्जाच्या आधारावर बांधला गेला होता, त्या समाजाला सगळे व्यक्ति समान आहे - हे स्वीकारणे तेवढे सोपे नाही.

स्त्रियांचा गौरवा बद्दल पाहु या. जगभरातुन अनेक समाजात चरित्राप्रमाणे पुरुषाचेच वर्चस्व आहे. लोकशाही देशात स्तियांना गौरव देणे, समान संधी देणे, या बद्दल स्त्रियांनी केलेल्या आंदोलनाच्या कारणाने काही परिणाम मिळता जुळता दिसुन येतो. याचा अर्थतत्व खरोखर आचरणात आल्यानंतर, कायद्यानुसार नैतिकता मिळत नसल्यास त्या विरोधात स्त्रीयांना आंदोलन करणे भाग पडते. लोकशाही नसलेल्या देशात, व्यक्तिस स्वतंत्र, मानसन्मानास कायद्याने मंजुरी, नैतिक दबाव नसल्यामुळे त्याचा भंग झाला तेव्हा, लोकांच्या आंदोलनास कायद्यांची मजुंरी नसते. जात पात या साठी पण हिच पध्दत वापरल्या जाते. समान दर्जा, समान संधी करीता आंदोलन करत असलेल्या वंछित आणि भेदभाव केल्या जाणाऱ्या जातींना भारत देशात लोकशाही त्याच्या दावांचे सामर्थ्य वाढवते. आता पण जातीवर आधारीत भेदभाव अन्याय अत्याचार आहेत. पण यांना कायदेशीर नैतिक आधार नाही. या कारणास्तव सामान्य नागरीक आपल्या लोकशाही हक्कांना अमुल्य असे समजतात.

कोणत्याही देशात लोकशाहीचा अंदाज लावण्यासाठी लोकशाही पासुन लोक काय अपेक्षा करतात हे पण महत्वाचे आहे.

लोकशाहीची विशेषता म्हणजे त्यांची निरंतर परिक्षा होत असते. एका परिक्षात उत्तीर्ण झाल्या बरोबर पुन्हा दुसरी परिक्षा समोर येते. लोकशाही पासुन लोकांना काही सुविधा



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

मिळाल्यास त्या पासुन आणखी अपेक्षा ठेवतात. व लोकशाहीस आणखी मजबुत करावे असे त्यांना वाटते. त्या करीता लोकशाहीच्या काम करण्याच्या पध्दती विषयी लोकंना विचारले. असता, लोक अनेक तक्रारी करतात आणि जास्त अपेक्षा करतात. म्हणजे लोकशाही विजयी आहे असे त्याचा अर्थ होतो. हे दर्शविते की, लोकांमध्ये जागृतता, अपेक्षा करण्याची क्षमता निर्माण झाली आणि आधिकारी वर्ग उच्च आणि पराक्रमी लोकांवर बारकाईन लक्ष ठेऊ लागले,

- दोन्ही देशातल्या सामाजिक, धामिर्क आणि भाषेतील विविधतांचा समावेश करण्यासाठी जे उपाय दिले गेलेत, त्यावर चर्चा करा?

लोकशाही विषयी लोक असंतोष प्रकट करणे म्हणजे लोकशाहीची पध्दत विजयी होत आहे असा त्याचा अर्थ होतो. ते लोकांचा दर्जा प्रजाजनपासुन नागरीकात बदलते.

आपल्या मतदाना बद्दल सरकार काय करण्याच्या पध्दतीत बद्दल होतो. आपल्या बऱ्याच मागण्या सरकार पुर्ण करते असा विश्वास बऱ्याच नागरीकांत निर्माण होतो.

## महत्वाचे शब्द

1. रशिया (यू.एस.एस.आर)
2. जाहीर चर्चा
3. नागरी हक्क
4. समाजिक आणि आर्थिक समानता
5. अंतर्गत युध्द

## आपल्या अभ्यासात सुधारणा करा

1. जबाबदार कायद्यानुसार सरकार असण्यासाठी लोकशाही काय करते? (AS1)
2. सामाजिक भेदभाव मिसळुन घेण्याच्या स्वभावाना लोकशाही कशा पध्दतीने प्रदर्शन करते?
